मंडल आयोग

सामाजिक परिवर्तनाचे पुढचे पाऊल





● धरमचंद चोरडिया

भारतीय जनता पार्टी - महाराष्ट्र

अज्ञान आणि दारिद्रयाच्या दुष्टचक्रात फसलेले भटक्या आणि विमुक्त जमाती, समाजाची सेवा करुन आपले पोट भरणारे न्हावी, धोबी, शिंपी, आदि, समाजाच्या गरजा भागविण्यासाठी कारागिरी करणारे सुतार, लोहार, कुंभार, आदि बलुतेदार, समाजात जे कनिष्ठ दर्जाचे व्यवसाय मानले जातात असे खाटीक रंगारी आदि व्यवसायिक आणि ज्यांच्या जवळ उत्पादनाचे फार मोठे साधन नाही, शिक्षण आणि संस्काराची शिदोरी नाही, सामाजिक प्रतिष्ठा नाही ज्या जनसमुदायातले अधिक लोक निर्धन आहेत, उपेक्षित आहेत, मागासले आहेत अशा सर्व जातींना प्रगतीच्या किंवा विकासाच्या वाटचालीत पुढे आणण्यासाठी, समाज व्यवस्थेत त्यांनाही सहभागी करुन घेण्यासाठी मंडल आयोगाच्या शिफारशी ही एक उपाय योजना आहे.

● धरमचंद चोरडिया

प्रस्तावना

मंडल आयोग आणि त्यानिमित्ताने आरक्षण धोरणाची चर्चा आज सर्वत्र सुरु आहे. लोकशाहीत चर्चेला आणि विचारमंथनाला निश्चितच महत्व आहे.

भारतीय जनता पार्टीने या संबंधी निसंदिग्ध व न्यायोचित भूमिका स्वीकारुन समाजातील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेल्यांना न्याय देणाऱ्यांना आरक्षण व्यवस्थेचे समर्थन केले आहे.

प्रगतीच्या वाटचालीत मागे राहिलेल्या बांधवांना न्याय देण्यात विलंब करणे हा देखील सामाजिक अपराध आहे. त्यामुळे आरक्षणाची प्रभावी अमंलबजावणी आवश्यक आहे.

विषम आणि शोषण व्यवस्थेत होणाऱ्या अन्यायाचे निराकरण करुन समतायुक्त व शोषणमुक्त व्यवस्था निमार्ण करण्यासाठी काही काळ आरक्षण आणि प्रोत्साहन देऊन सर्वांना समान प्रारंभ रेषेपर्यंत आणल्यानंतर गुणवत्तेची वा स्पर्धेची भाषा कोणालाही बोलता येईल. पण जोपर्यंत संधीची व प्रतिष्ठेची समता नाही तोवर ही गुणवत्ता एक ढोंग आहे याचा विचार करण्याची गरज आहे.

संधीची आणि प्रतिष्ठेची समान संधी ज्या दिवशी सहज मिळेल, जाती व्यवस्था जेव्हा संपेल, अस्पृश्यता, उच्च-निचता जेव्हा राहणार नाही त्या दिवशी आरक्षणाची गरजच राहणार नाही, असा दिवस लवकर उगवावा हीच आपली धडपड आहे.

आणि म्हणूनच आपण पहिल्या टप्प्यात अनुसूचित जाती-जमातींना दुसऱ्या टप्प्यात राज्यांमध्ये इतर मागासवर्गीयांना, महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांना, तिसऱ्या टप्प्यात नवबौद्धांना आणि आता चौथ्या टप्प्यात केंद्रात इतर मागासवर्गीयांना आणि पाचव्या टप्प्यात आर्थिक दुर्बलांनाही आरक्षण देण्याची व्यवस्था आपण केली आहे. हे समाजपरिवर्तनाचे पुढचे पाऊल आहे. या सर्वांच्या समर्थनासाठी समाजात व्यापक प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेश सरचिटणीस आणि दलित आदिवासी व मागासवर्गीयांच्या लढ्यात सदैव अग्रणी असलेले माझे सहकारी श्री. धरमचंद चोरडिया यांनी लिहीलेली ही पुस्तिका प्रबोधनासाठी निश्चितच उपयोगी ठरेल असा विश्वास आहे.

महात्मा फुले स्मृति व डॉ. आंबेडकर जन्मशताब्दीच्या या वर्षात महाराष्ट्रात या शिफारशी लागू करण्याच्या मागणीचा मी पुनरुच्चार करतो, व त्यासाठी संघठीत प्रबोधनाचे कळकळीचे आवाहन महाराष्ट्राच्या जनतेला करतो.

(गोपीनाथ मुंडे) अध्यक्ष

भारतीय जनता पार्टी — महाराष्ट्र प्रदेश

भारतीय जनता पार्टी — महाराष्ट्र प्रदेश

मंडल आयोग विषयक प्रस्ताव

गेली दहा वर्षे मंडल आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात अशी भारतीय जनता पार्टीची मागणी होती. राष्ट्रीय मोर्चा सरकारने भारतीय जनता पार्टीची ही मागणी मान्य केली या बद्दल महाराष्ट्र प्रदेशाची ही कार्य समिती समाधान व्यक्त करीत आहे.

गेल्या लोकसभा निवडणूकीच्या राष्ट्रीय जाहिरनाम्यात भारतीय जनता पार्टीने आपली राखीव जागा विषयक भूमिका खालीलप्रमाणे स्पष्टपणे मांडली होती.

१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती संबंधीच्या राखीव जागांचे धोरण पूर्ववत राहील.

२) मंडल आयोग अहवालाच्या आधारावर मागासवर्गीयांना राखीव जागा देण्यात येतील. त्यात या मागासवर्गीयांत जे आर्थिक दृष्ट्या अधिक मागासलेले असतील त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) गरीबी हे ही मागासलेपणाचे कारण असल्यामुळे इतर जातींमधील आर्थिक मागासलेल्यांना राखीव जागा देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

मंडल आयोगासंबंधी केंद्र सरकारने नुकत्याच जाहिर केलेल्या निर्णयात भारतीय जनता पार्टीची एक मागणी पूर्ण झालेली आहे. मंडल आयोगा अंतर्गत आर्थिक मागासलेल्यांना प्राधान्य देण्याची भारतीय जनता पार्टीची मागणीही सरकारने मान्य केली असती तर अधिक बरे झाले असते. अजूनही केंद्र सरकारने या बाबतीत विचार करावा.

भारतीय जनता पार्टीच्या राखीव जागा विषयक धोरणातील इतर जातीतील आर्थिक मागासलेल्यांना काही राखीव जागा हे तिसरे कलमही महत्वपूर्ण आहे. केंद्र सरकारने भारतीय जनता पार्टीच्या या मागणीचा गंभीरपणे विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. महाराष्ट्र प्रदेश कार्यसमितीचा केंद्र सरकारला आग्रह आहे की मंडल आयोगासंबंधी अधिसूचना जाहीर करताना मंडल आयोगात समाविष्ट नसलेल्या इतर जातीतील आर्थिक मागासलेल्यांनाही राखीव जागा जाहीर करणारी अधिसूचना काढावी.

मंडल आयोगासंबंधी केंद्र सरकारने घेतलेला निर्णय फक्त केंद्रीय सेवांना लागू आहे. महाराष्ट्रात मागासवर्गीयांची संख्या फार मोठी आहे. भारतीय जनता पार्टीची ही महाराष्ट्र प्रदेश कार्यसमिती महाराष्ट्र सरकारला आग्रह करीत आहे की, त्यांनीही केंद्र सरकारच्या पावलावर पाऊल टाकून मंडल आयोगाच्या शिफारशी महाराष्ट्राला लागू कराव्यात.

दि.१२ व १३ ऑगस्ट, ठाणे.

प्रदेश कार्यकारीणी बैठक

मंडल आयोग-सामाजिक परिवर्तनाचे पुढचे पाऊल

समतेसाठी आरक्षण

जन्माधिष्ठित चातुर्वर्ण्य व्यवस्था त्यातून निर्माण झालेली उच्च नीचता आणि अस्पृश्यता, जाती व्यवस्था, त्याची उतरंड आणि त्यातील श्रेष्ठ-कनिष्ठता यामुळे भारतीय समाजातील अनेक घटकांना हजारो वर्षे दुय्यम आणि उपेक्षित जीवन जगावे लागले. त्यांच्यावर झालेल्या अन्याय अत्याचारांनी माणुसकीला काळीमा फासला ही वस्तुस्थिती आता सर्वमान्य आहे.

जनावरांना पिण्यास खुले असलेले पाणवठे, मनुष्याला मात्र खुले नव्हते. मुग्यांना साखर घालणारे आणि प्राणिमात्रांवर प्रेम करण्याचा संदेश देणारे, दुसरीकडे मात्र माणसाच्या सावलीचाही विटाळ मनात होते. शिक्षण, रोजगार, प्रतिष्ठा आणि सत्ता या सर्वांपासून काही जनसमुदाय वंचित ठेवले गेले, एवढेच नव्हे तर प्रगतीच्या वाटचालीत मागे आणि मागे ढकलेले गेले ही सत्यस्थिती नाकारता येणार नाही.

अस्पृश्य समजल्या जाणाऱ्यांवर शतकानुशतके झालेले अत्याचार आणि समाजापासून दूर असलेल्या वनवासी बांधवांची झालेली उपेक्षा, यामुळे जे मागे राहिले त्यांना विशेष संधी देऊन स्पर्धेच्या प्रारंभ रेषेपर्यंत आणून उभे करण्यासाठी आपण 'आरक्षण आणि उत्तेजन' हे धोरण स्वातंत्र्यानंतर संविधानांत स्वीकारले आहे.

अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या अनुसूचित जाती आणि गिरिकंदरात राहणाऱ्या अनुसूचित जमातींना आज घटनेचे संरक्षण असून सर्व लोकशाही संस्थामध्ये प्रतिनिधित्व आणि शिक्षणाची हमी तसेच शासन यंत्रणेत सहभागाची संधी आपण मान्य केली आहे. परंतु त्याच बरोबर "सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या" वर्गासाठी देखील असली उपायोजना करण्याची आवश्यकता घटना समितीने मान्य केली तरी त्यासाठी तरतूद असूनही ती व्यवहारात आलेली नव्हती.

अशा सर्व इतर मागासवर्गीयांचा विचार करण्यासाठी म्हणजेच त्यांचे निकष ठरवून त्यांना द्यावयाच्या सवलतींची शिफारस करण्यासाठी मंडल आयोगाची नेमणूक जनता राजवटीत झाली. (पहा परिशिष्ट १)

अज्ञान आणि दारिद्राच्या दुष्टचक्रात फसलेल्या भटक्या आणि विमुक्त जमाती, समाजाची सेवा करून आपले पोट भरणारे न्हवी, धोबी, शिंपी, आदि, समाजाच्या गरजा भागविण्यासाठी कारगिरी करणारे सुतार, लोहार, कुंभार, आदि बलुतेदार, समाजात जे कनिष्ठ दर्जाचे व्यवसाय मानले जातात असे खाटीक रंगारी आदि व्यवसायिक आणि ज्यांच्या जवळ उत्पादनाचे फार मोठे साधन नाही, शिक्षण आणि संस्काराची शिदोरी नाही, सामाजिक प्रतिष्ठा नाही ज्या जनसमुदायातले अधिक लोक निर्धन आहेत, उपेक्षित आहेत, मागासले आहेत

अशा सर्व जातींना प्रगतीच्या किंवा विकासाच्या वाटचालीत पुढे आणण्यासाठी, समाज व्यवस्थेत त्यांनाही सहभागी करून घेण्यासाठी मंडल आयोगाच्या शिफारशी ही एक उपाय योजना आहे.

आपल्या समाज व्यवस्थेत आता पर्यंत ज्यांना संरक्षण मिळाले नाही त्यांना दिलेले हे संरक्षण आहे. ते उशिरा व अपुरे दिले आहे. घटनेच्या ज्या कलमात समान संधीचे तत्व आहे त्यातच या संरक्षणाचे प्रावधान आहे. (कलम १५ (४) १६ (४) २९ व ३४०) आरक्षण हे समानतेच्या किंवा समतेच्या विरुद्ध आहे अशी समतेचीच ढाल पुढे करून एक भ्रम निर्माण केला जात आहे. परंतु समता समानांमधेच नांदू शकते, असमान असलेल्यांना समान संधी म्हणजेच विषमता जोपासणे आहे' ही वस्तुस्थिती येथे नाकारली जाते, आणि ज्याच्या जवळ काहीच नाही अशांना समान संधी देऊन त्यांच्यातली दरी कमी होणार नाही तर उलट रुंदावेल. एकाने पुढे उभे राहून आणि दुसऱ्याने मागे राहून त्यांच्यात पळण्याची शर्यत ही समान स्पर्धा होऊ शकत नाही. जो मागे आहे त्याला पुढे असलेल्याच्या बरोबरीला आणणे हीच विशेषसंधी आणि त्यात चूक काय? त्यामुळे आरक्षण समतेच्या विरोधी नसून समतेसाठी आवश्यकच आहे.

अशी संधी केवळ सामाजिक क्षेत्रातच आहे असे नाही तर देशाच्या प्रगतीत ग्रामीण भागावर अन्याय झाला म्हणून आता अग्रक्रम बदलून त्यांना न्याय देण्याची संकल्पना आज सर्व मान्य आहे. राज्याच्या प्रगतीत काही भोगौलिक विभाग मागासलेले राहिले म्हणून विदर्भ, मराठवाडा कोकणाची पुर्वतुट भरून काढा ही मागणी सर्वत्र होत आहे. मोठ्या उद्योगांपासून लघु उद्योगांचे संरक्षण व्हावे अशी व्यवस्था आहे. छोट्या व दुर्बल शेतकऱ्यांना विशेष सवलती आहेत. तर कर वसूल करतांनाही शेतीची पीछेहाट लक्षात घेऊन आयकरात दोन प्रकार केले आहेत. आणि इतकेच नव्हे तर देशी मालाला संरक्षण व उत्तेजन देण्यासाठी परदेशी माल जो कदाचित गुणवत्तेत उंची असेल त्याच्या आयातीवर बंदी घालून आपण एक संरक्षण दिलेच आहे. मग शहरी आणि ग्रामीण विषमता, भौगोलिक मागासलेपणा, उद्योग धंद्यातील छोट्यांचे शोषण, शेतकऱ्यांची हलाखी आणि स्वदेशीला उत्तेजन या सर्व क्षेत्रात आपण केवळ समान संधीचे नव्हे तर अंतिमतः समता निर्माण करण्यासाठी विशेष संधी, संरक्षण आणि उत्तेजनाचे जे तत्व स्वीकारले आहे ते सामाजिक न्यायाच्या बाबतीत नाकारण्याचे कारण काय?

जात हाच निकष का?

सोयी-सवलती, आरक्षण यासाठी ''जात'' हा निकष नको असाही एक आक्षेप आहे. परंतु याचे ही दोन पैलू आहेत. एकतर आपल्या देशात असलेली जाती-व्यवस्थेची उतरंड, त्यामुळे श्रेष्ठ कनिष्ठता आणि अन्याय व उपेक्षा झाली आहे ही वस्तुस्थिती आहे. औद्योगिकरणामुळे काही ठिकाणी जातीची बंधने सैल झाल्याचे दिसत असले तरी अद्यापही रोटी-बेटी

व्यवहारात जाती उपजातींच्या चिरेबंदी भिंतींचे अस्तित्व सर्वत्र आहेच.

त्यामुळे ज्या समुदायात शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक मागासलेल्यांची संख्या अधिक आहे असे जनसमुदाय ठरविण्यासाठी जात हाच सर्वात महत्वाचा निकष आहे. पण जात ठरवितांना वापरलेले निकष मात्र सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक पण आहेत (परिशिष्ट-2 पहा)

जातीय तत्वावर आरक्षण ठेवल्याने जातीय भावना तीव्र आणि घट्ट होतील असाही आक्षेप घेतला जातो. वास्ताविक आरक्षणामुळे परंपरागत चालत आलेले जाती व व्यवसाय आणि त्यामुळे श्रेष्ठ कनिष्ठतेचे समीकरण मोडकळीस येणार आहे. एखाद्या भंगी समाजातला मुलगा सफाई कामगार न बनता कारकून बनला किंवा एखादा न्हावी केशकर्तांना ऐवजी डॉक्टर बनून शल्यक्रिया करू लागला तर जातीयतेचा भौतिक आधार ढिला होण्यास मदत झाल्याशिवाय राहणार नाही. ज्या राज्यांमध्ये या पूर्वीपासूनच अशा सवलती आहेत त्या ठिकाणी जातीय तणाव वाढले नाहीत किंवा महाराष्ट्रतही १९६२ पासून १० टक्के सवलती इतर मागासवर्गीयांना आहेत. त्यामुळे कुठे काय बिघडले? म्हणून हा प्रचार निव्वळ खोटा आहे. आणि एका जाती संघटनेने हे म्हणावे हे तर हास्यास्पद आहे. आणि आता तर ते आम्हालाही त्यात घ्या असेही म्हणू लागले आहेत.

आणि जेथे आरक्षण नाही तेथे म्हणजे हिंदू व शीख, शिया-सुन्नी, दिगंबर-श्वेतांबर आदि तणाव त्या त्या क्षेत्रात आरक्षण नसूनही आहेत. त्यामुळे जातीय, सांप्रदायिक वर्गीय तणाव आहेत त्याची काही वेगळी कारणे ही आहेत केवळ जाती निकष आणि त्यानुसार आरक्षण हेच त्याचे कारण नाही.

एकात्मतेसाठी सहभाग आवश्यक

मंडल आयोगामुळे ७५ टक्के असलेल्या खऱ्या बहुजन समाजाला न्याय मिळणार आहे आणि तरी देखील उरलेल्या ५० टक्के जागा मोकळ्याच राहणार आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मंडल आयोग म्हणजे बहुजन समाजावर आक्रमण ही हाकाटी खोटी आहे. भ्रामक आहे. समाजाची एकात्मककता त्यामुळे भंगणार आहे. हा प्रचार पण मतलबी आहे. गैरसमजावर आधारीत आहे.

उलट एकात्मता मजबूत करण्यासाठी प्रशासनाच्या सर्व स्तरात सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. मंत्री मंडळ आणि प्रशासन यंत्रणा मग ती मुख्य सचिवांपासून तर तलाठी-पोलीस पाटलां पर्यंत सर्वत्र कोणा एक समुदायाची मक्तेदारी असण्यापेक्षा सर्व समाज घटकातील व्यक्ती त्यात असल्यानेच विश्वासाचे आणि आपुलकीचे वातावरण बनेल आणि सरकार चालविण्यांत आपणही सहभागी आहोत ते आपले आहे आणि आपल्या हितासाठी काम करील असा विश्वास वाढण्यास त्याची मदत होणार आहे. त्यामुळे सर्वांसाठी, सर्वांमधून,

सर्वांचे असेच प्रशासनाचे स्वरूप लोकशाही व्यवस्था बळकट करू शकेल. आज हे प्रमाण अत्यल्प आहे. (तक्ता १ व २ पहा) ते चित्र बदलण्यासाठी आरक्षण हवे व त्याची प्रभावी अंमलबजावणी पण हवी आहे.

घटनेच्या १५ (४), १६ (४) व २९ व ३४० व्या कलमानुसार अनुसूचित जाती आणि जमाती शिवाय अन्य मागासवर्गीयांसाठी सामाजिक आणि शैक्षणिक आधारावर आरक्षण व इतर सवलती देण्याची तरतूद आहे (परिशिष्ट - ३ पहा) त्यानुसार द्यावयाच्या सवलतींसाठी कालेलकर आयोग नेमला गेला पण आधी आयोगाने कोलांटी उडी मारली आणि त्याचा फायदा घेऊन प्रदेशांकडे हा प्रश्न लोटून केंद्रातील कॉंग्रेस शासनाने चाल ढकल कायम ठेवली. जनता सरकारने मंडल आयोग नेमून हा प्रश्न सोडविण्याचे भक्कम पाऊल उचलले. मंडल आयोगाचा अहवाल सादर होऊन वर्षे लोटली पण श्रीमती इंदिरा गांधी व राजीव गांधीचे सरकार पुन्हा चाल ढकल करून मागास वर्गांयांचे न्याय हक्क डावलत होते. उच्चवर्णीयांचे हितसंबंध जपणाचे काम आणि मागासवर्गीयांच्या प्रेमाचा बुंरखा अशी फसवणुक हेच त्यांचे धोरण होते. निवडणुकी पूर्वी पण त्यांनी राखीव जागा भरण्याच्या घोषणा केल्या पण प्रत्यक्षात काहीहीं केले नाही.

महाराष्ट्रात शिफारशी लागू करा

महाराष्ट्रात श्री. वसंतदादा पाटील यांच्या इं. कॉ. शासनाने आधी या शिफारशी अमान्य करून, नंतर चर्चा करण्यातही आडमुठे धोरण स्वीकारने मागासवर्गीय विरोधी धोरणाची री ओढली ही कृती सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत गेली शंभर वर्षे अग्रदूत म्हणून वावरणाऱ्या महाराष्ट्राच्या प्रतिमेला कलंकित करणारी आणि काळाचे चाक उलटे फिरविणारी होती. महाराष्ट्राने नवबौद्धांचा अनुसूचित जातीत समावेश केला आहे, भटक्या विमुक्तांना चार टक्के राखीव जागा दिल्या आहेत आणि शिवाय इतर मागासवर्गीयांना देखील दहा टक्के राखीव जागा आहेत त्यामुळे तत्व म्हणून हे आम्ही केव्हाच स्वीकारले आहे. प्रश्न उरतो फक्त प्रमाणाचा टक्केवारीचा परंतु सरकार विचार न करता, जातीय द्वेष भावनेला आणि दबावाला बळी पडून आंधळा विरोध करीत होतें ही बाब प्रगत महाराष्ट्राच्या रहिवाश्यांना लाजिरवाणी वाटावी अशीच होती.

श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली इं. कॉ. शासनाने आजही तेच धोरण पुढे सुरु ठेवले आहे. केंद्र सरकारने आदेश दिल्यास राज्यात या शिफारशींची अंमलबजावणी करु हे त्यांचे विधान फसवे आहे मुळात सध्या महाराष्ट्रात इतर मागासवर्गीयांसाठी १० टक्के व भटक्या-विमुक्तांसाठी ४ टक्के आरक्षण आहे. मंडल आयोगाच्या यादीत भटक्या-विमुक्तांचा समावेश आहे. त्यामुळे एकूण १४ टक्के आरक्षण आहे. ते राज्य सरकारनेच केले आहे कारण तसे करण्याचा राज्याला अधिकार होता व तो आजही आहे त्यामुळे उर्वरित १३ टक्के

आरक्षण वाढविणे हे ही राज्य सरकारच्याच अधिकारात आहे पण कॉ. आय शासनाची इच्छा नसल्यामुळे यात वाढ होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

धनगर आदि काही जमाती भटक्या-विमुक्तात सम्मीलीत केल्याने त्याच्यासाठी असलेले ४ टक्के आरक्षण तोकडे असल्याने ते वाढविण्याची मागणी या पूर्वी केली गेली असून त्याचा विचार करण्याचे आश्वासन शासनाने दिलेले आहे. ते आणि इतर मागासवर्गीयांचे आरक्षण २७ टक्के होईल एवढे वाढविण्याचे पाऊल महाराष्ट्र शासनाने उचलण्याची आज गरज आहे. आणि केवळ शासकीय निमशासकीय सेवेत नव्हे तर सहकारी संस्थामध्ये आणि केवळ अनुदानित शिक्षण संस्थामध्ये नव्हे तर विना अनुदान शिक्षण संस्थामध्ये पण आरक्षण धोरण राबविण्याची खरी गरज आहे.

मंडल आयोगाचे एक सदस्य श्री. नायक यांनी आयोगाच्या अहवालाला एक भिन्न मतपत्रिका जोडली होती. इतर मागासवर्गीयांना सवलत देण्याचे त्यांनी मान्य केले असून त्या अंतर्गत मागास आणि अतिमागास असे दोन उप वर्ग करून त्यांच्यासाठी स्वतंत्र आरक्षणाची म्हणजेच अति मागास वर्गासाठी पंधरा टक्के आणि मागासवर्गासाठी बारा टक्के आरक्षणाची सूचना केली आहे. त्यामागे ह्या मोठ्या यादीत मोडणाऱ्यां मधे खूप विषमता व अंतर असल्यामुळे एकत्र सवलती दिल्याने त्यातले मोठे लहानांना डावलतीत थोडे शिकलेले पुढे जातील आणि अक्षर ज्ञान नसलेल्यांना संधी मिळणार नाही असा तर्क दिला आहे. तो पूर्णपणे नाकारता येणार नाही. उदा. महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त जमाती आणि अन्य यात निश्चित फरक आहे. आणि म्हणून भटक्या-विमुक्तांना अनुसूचित जमातीच्या समकक्ष मानून लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्रपणे पूर्ण सवलती देणे आवश्यक आहे.

मागास जातीतील आर्थिक दुर्बलांना अग्रक्रम

या यादीत अति मागास व मागास असे दोन भाग करावेत असा कालेलकर आयोगाचाही निष्कर्ष होता व तसेच मत श्री. नायक यांनाही मांडले होते, कारण याचा फायदा त्यातलेच पुढारलेले घेतील ही त्यांची भिती होती. पण तसाच एक दुसरा मुद्या आज उपस्थित झाला आहे. ज्यांचा विकास झाला आहे किंवा जे धनाढ्य आहेत त्यांना आरक्षण व सवलती का? असा हा मुद्दा आहे. आणि त्यात बरचसे तथ्य पण आहे. दलित-आदिवासींमध्ये साधारणतः ९५ ते ९९ टक्के लोक आर्थिकदृष्टया पण मागासलेलेच आहेत पण मंडल आयोगातील जातीत हे प्रमाण व त्यातील अंतर हे तुलनेने अधिक असू शकते त्यामुळे या सवलतींचा फायदा कोणाला मिळणार असा प्रश्न येऊ शकतो.

सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणा बरोबरच आर्थिक मागासलेपणा ज्यांच्या नशीबी आले आहे त्याला अग्रक्रम मिळणे यात काहीच गैर नाही. ज्या मंडल आयोगाने देखील जातीसाठी ४ सामाजिक व ३ शैक्षणिक निकषा बरोबरच ४ आर्थिक निकष ठेवलेच होते

तेथे त्यातील दोन व्यक्तीत आर्थिक दृष्टया तिन्ही प्रकारचे मागसलेपण असणाऱ्या व्यक्तीला दोन प्रकारच्या मागासलेपणा असलेल्या व्यक्तीपेक्षा अधिक गरज आहे हे लक्षात घेऊन त्याला प्रथम संधी देणे न्यायोचित आहे. शिवाय ५२ टक्के लोकांसाठी २७ टक्केच जागा देतांना असा अग्रक्रम दिला नाही तर अधिक सक्षम व प्रभावी समुदायांना सवलतींचा लाभ होईल आणि रांगतेला शेवटचा माणूस पुन्हा जेथे आहे तेथेच राहील. ही भिती साधार आहे पुर्वानुभव काहीसा तसाच आहे.

आर्थिक निकष लावणे अवघड आहे असा एक मुद्दा याबाबत मांडला जातो त्यात थोडे तथ्य पण आहे. कदाचित पूर्णपणे निर्दोष व्यवस्था त्यासाठी नसेलही आणि व्यवस्थेतून काही लोक सुटूनही जातील किंवा गैर मार्गाने व्यवस्था मोडतीलही पण हे सर्वच क्षेत्रात आहे. लोक आयकर चुकवितात म्हणून आयकरच नको कायदा मोडतात म्हणून कायदाच नको असे तर करता येणार नाही. त्यामुळे असे निकष लावता येतील त्यातून अधिकाधिक उत्तम व्यवस्था निर्माण करता येईल बिहारमध्ये असा आर्थिक निकष त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. कर्पूरी ठाकूर यांनी लागू केला होता. त्यामुळे ते नविन नाही. अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक शिष्यवृत्या देतांना आर्थिक उत्पनाची अशी अट सध्या आहेच. ज्यांचे उत्पन्न आयकराच्या किमान सीमेपेक्षा कमी आहे. ज्याच्या जवळ सिंचनाखालची जमीन नाही. ज्यांच्या नावे चार चाकी वाहन नाही. ज्यांच्या घरात एकही नोकर नाही. जो बेघर आहे किंवा छोट्या वा कच्च्या घरात-झोपडीत राहतो आदि निकष लावून हा फायदा साधनहिन, भूमिहिन, निर्धन, बेघर माणसाला आधी मिळेल अशी व्यवस्था करता येऊ शकते आणि ती त्या जातींच्या अंतर्गत असेल त्याचा फायदा अन्य सवर्ण जातींना मिळणार नाही याला कोणाचाही आक्षेप असू नये.

आर्थिक दुर्बलांना पण आरक्षण

सामाजिक मागासलेल्यांचे हे आरक्षण कायम ठेवून आर्थिक वर्गाला आरक्षण, संरक्षण वा सवलती वा अग्रक्रम देण्यासही मागासवर्गीयांचा विरोध असू शकत नाही कारण तो पण बहुतांष गरीबच आहे. एका गरीबाचा दुसऱ्या गरीबाला विरोध असण्याचे कारण नाही. समाजातील सामाजिक प्रतिष्ठेचा व प्रगतीचा संबंध काही आर्थिक स्थितीवर पण अवलंबून आहेच आणि अखेर पोटाचा-उपजिविकाचा प्रश्न व जगण्याच्या अधिकार त्यालाही असल्यामुळे त्याची पण सोय करणे सामाजिक कर्तव्य आहे. वर उल्लेख केलेल्या अन्य आर्थिक निकषांच्या आधारावर असे आरक्षण आवश्यकच आहे.

मंडल आयोगा अंतर्गत आर्थिक निकषांवर अग्रक्रम आणि अन्य दुर्बलांसाठी पण आरक्षण-अग्रक्रम (ठराव पहा) या मुद्यावर आज भारतीय जनता पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टी, इंदिरा कॉंग्रेस आणि राष्ट्रीय मोर्चातीलही बरेचहे गट यांचे एकमत आहे.

या सुधारणासह मंडल आयोग शिफारशींची अंमलबजावणी हीच न्याय्य भूमिका आहे तशी घोषणा एकत्रच झाली असती तर कदाचित असंतोष कमी उसळला असता. पण नंतर का होइना आर्थिक दुर्बलांसाठी पण ५ ते १० टक्के आरक्षणाचा प्रस्ताव आला आहे. हे स्वागतार्हच आहे.

पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी घिसाडघाईने घोषणा करूनही थोडा विरोध ओढवून घेतला आहे कारण सामाजिक सुधारणांचा हा विषय राजकीय स्वार्थांशी, मतांच्या राजकारणाशी व कुटनितीच्या खेळांशी जोडला जाऊ नये त्यामुळे त्या विषयाची प्रामणिकता त्या व्यक्तीची संवेदनक्षमता आणि त्या निर्णयाची विश्वासार्हताच प्रश्नांकित होते व त्यातुन सामाजिक अहितच होते. आज मंडल आयोगाला ज्यांचा विरोध नाही त्यांचाही ज्या पद्धतीने तो निर्णय झाला याला विरोध आहे व तो रास्त आहे पण याचा अर्थ शिफारशींना विरोध असा होत नाही.

राष्ट्रीय सहमतीची जपमाळ जपणाऱ्या पंतप्रधानांनी इतक्या निर्णयात सहमती शिवाय व राष्ट्रीय मोर्चाला पाठींबा देणाऱ्या पक्षांना ही अंधारात ठेवून हा निर्णय घेतला त्यामुळे अविश्वासाचे व हेतू संबंधी शंकेचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविकच आहे.

भारतीय समाज व्यवस्था व त्यातील जाती व्यवस्था आणि त्याचे स्वरूप ज्यांना पुरेसे माहिती नाही अशा एका वर्गाकडूनही विरोध होत आहे तर बेरोजगारीच्या दुःखाने वैफल्यग्रस्त झालेला तरुण देखिल कळत-नकळत या विरोधात ओढला जात आहे.

पण विरोध तेवढाच मर्यादित नसून जातीय व वर्ण वर्चस्वाच्या भूमिकेलाच धक्का लागल्यामुळे आणि सध्याच्या व्यवस्थेत ज्यांचे हितसंबंध आहेत ते धोक्यात येतात यामुळेही विरोध आहे व तो सामाजिक समरसतेला आणि राष्ट्रीय एकात्मतेला घातक असल्यामुळे मुळापासून मोडून काढला पाहिजे.

दोन गरीबांध्ये भांडण नको

पण दुसऱ्या बाजूने मंडल आयोग समर्थकांनी देखिल जाती किंवा वर्ग युद्धाची प्रसिद्धीप्रिय भाषा न करता सामाजिक सुधारणांसाठी खंबीर भूमिकेने आपली बाजू मांडली पाहिजे व समाजप्रबोधनाचे काम केले पाहिजे. तरुण माणसाला आणि विद्यार्थ्यांना हे समजून सांगितले पाहिजे की खरा प्रश्न रोजगाराच्या संधीचा आहे. त्यातील आरक्षणाचा नव्हे १००० लोकांना रोजगार वा नोकरी हवी पण तसे रोजगार १०० च आहेत व त्यामुळे ९०० लोक वंचित आहेत. त्यात इकडचे ४९ तिकडे टाकून तिकडचे ४९ इकडे घेतल्याने ४९ व्यक्ती बदलतील पण वंचितांची संख्या ९०० कायमची राहणार आहे. आणि त्याला आरक्षण धोरण जबाबदार नसून चूकीचे नियोजन चुकीचे आर्थिक धोरण आणि अग्रक्रम जबाबदार आहेत आणि खरा संघर्ष करावयाचा तर तो तेथे केला पाहिजे. किमान एका गरीबाने जो सामाजिक मागासलेला आहे त्याने दुसऱ्या गरीबाशी संघर्ष करणे म्हणजे नागड्या माणसाने दुसऱ्याची लंगोटी

हिसकावून त्याला नागडे करण्याचाच प्रकार आहे. त्या ऐवजी लढले पाहिजे ते भांडवलशाही शोषण व्यवस्थेशी.

दुर्दैव असे की हे दोन्ही गरीब आपसात भांडतात तेव्हा एक दुसऱ्याला म्हणतो जन्माधिष्ठीत जातीच्या आधारावर आरक्षण कशाला? गुणंवत्तेवर व कर्तृत्वावर का नको पण तो हे म्हणत नाही की एखाद्या धनाढ्य माणसाच्या घरी जन्मलेले धनिक बाळ गुणवत्ता व कर्तृत्व घेऊनच नव्हे तर जन्मतःच सोन्याचा चमचा घेऊन जन्मतो, अनेक उद्योगांचा; मालमत्तेचां संचालक, मालक वा वारस बनतो. या जन्माधिष्ठीत पैतृक आरक्षणाचे काय? येथे गुणवत्तेचा मुद्दा कोणीच का उपस्थित करीत नाहीत येथे समान संधी, कर्तृत्वाला व गुणवत्तेला वाव का नको? तीन चतुर्थांश भाकरी जेथे सुरक्षित आहे त्या विरुद्ध लढण्या ऐवजी चतकोर भाकरीच्या वाटपासाठीच आज तुंबळ युद्ध सुरु आहे.

तेव्हा गुणवत्ता का आठवत नाही

महाराष्ट्रात आणि इतरही अनेक राज्यात विना अनुदान तत्वावर शैक्षणिक संस्था चालतात. आता तर वैद्यकीय महाविद्यालये पण सुरु झालीय आणि त्यात २० टक्के व्यवस्थापनाच्या जागा तेथे अत्यंत कमी गुण असलेले विद्यार्थी देखिल लाखो रुपयांची देणगी घेऊन भरले जाता उर्वरित ऐंशी टक्के जागांमध्ये देखिल देणग्या घेतल्या जातातच तेथे ना आर्थिक दुर्बलांना आरक्षण ना दलितांना ना आदिवासींना आणि ना इतर मागासवर्गीयांना आणि तेथे गुणवत्तेचा तर प्रश्नच नसून सरळ शिक्षणाचा धंदा आणि पदव्यांचे दुकान थाटले गेले आहे पण त्याला गुणवत्तेच्या मुद्यावर कोणीही विरोध करीत नाही. पण त्याच गुणवत्तेच्या मुद्यावर सामाजिक आरक्षणाच्या विरोधात जेव्हां जे लोक मारु वा मरु या आवेशाने तुटून पडतात त्यांची गुणवत्ता तपासून पाहण्याची गरज आहे. त्यांचा राग केवळ गुणवत्तेचा आहे की ती ढाल पुढे करून सामाजिक विद्वेषाच्या आणि जातीय स्वार्थाच्या तलवारी त्यांनी उपसल्या आहेत हे तपासून पाहिले पाहिजे.

गुणवत्तेच्या मुद्यात ही तथ्य आहे पण ते मर्यादित आहे. ते अंतिम सत्य नव्हे. आणि 'गुणवत्ता' म्हणजे 'तुलनात्मक गुणवत्ता' ज्याला गुणवत्ता वाढविण्यासाठी पिढयानपिढ्या, कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक अनुकूलता आहे, आणि दुसरीकडे ज्याच्या पालकांना शिक्षण हा शब्द कधी कानावर पडला नाही आणि आपला मुलगा १० वर्षाचा झाला म्हणजे त्याला ही मोलमजुरीला लावून आपल्या तुटपुंज्या उत्पन्नात थोडीशी भर पडेल आणि दोन घास जास्त घेता येतील अशी ज्याची स्थिती आहे त्या दोघांची तथाकथित गुणवत्ता वेगळी असणारच.

गुणवत्ता कमी असून शिक्षणांत व कारभारात मागासवर्गीयांना प्राधान्य मिळाल्याने कार्यक्षमतेवर परिणाम होईल हाही आक्षेप घेतला जात आहे. खर म्हणजे प्रशासकीय

कार्यक्षमतेबद्दल काय बोलावे? जवळजवळ संपूर्णपणे प्रगत वर्गाच्या हातात असलेली प्रशासन यंत्रणा अकार्यक्षम असणे हे अत्यल्प प्रमाणातील मागासवर्गीयांचे कर्तृत्व आहे असे म्हणणे हा जावई शोधच म्हणावा लागेल.

आणि सेवेत सहभागी होतांना किमान गुणात काही मागासवर्गीयांना सवलत नाही उदाहरणार्थ प्राध्यापक होण्यासाठी किमान ६० गुण लागतात तर मागासवर्गीयांना त्यात सवलत नाही. ६० च्या वर कोणाला कीती गुण ही तफावत असू शकते एखाद्या क्लार्कच्या नोकरीसाठी बी. ए. ही किमान पात्रता अट आहे ती दोघांना समान आहे पण त्यासाठी एखाद्या एम्. ए. माणसाने अर्ज केला म्हणजे अधिक गुणवत्ता मानणे चूक आहे. कारण ती अनावश्यक आहे.

वैद्यकीय, अभियांत्रिकी आदि व्यावसायिक शिक्षण संस्थाच्या प्रवेशाच्या प्रश्नांवरुन आंदोलन झाले होते. त्यातील काही मुद्दे असेच परिस्थिती सापेक्ष आहेत. फक्त ३५ मार्क असले तरी प्रवेश मिळतो आणि डॉक्टर सर्वांचेंच आरोग्य धोक्यात आणतील असा प्रचार होतो. खरे म्हणजे किमान गुणांची अट आहे व प्रवेशात सवलत असली तरी परीक्षा पास होण्यासाठी नाही. सध्या स्पर्धेत दलित व मागासवर्गीय विद्यार्थी मागे नाहीत, फरक फक्त थोड्या गुणांचाच असतो. देशांतील व एका राज्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयाचे प्रवेश पाहिले ते त्यांतही गुणांचही तफावत आहे मग ही दूर करावयाचे तर मग उंदा. मराठवाडा आणि विदर्भाच्या महाविद्यायांत मुंबईच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल ते स्थानिक विद्यार्थ्यांना चालेल का? मुळांत एम. बी. बी. एस. वा एम्. डी. डॉक्टरांपेक्षा इतर अनेक पदव्या, पदविका आणि आर. एम. पी. म्हणजे रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टीशनर्स व इलेक्ट्रोपथी कोर्स यांची संख्या कितीतरी पटीने अधिक व त्यांत अनेक गैरप्रकार मग त्यामुळे आरोग्य धोक्यात येत नाही का? प्रवेश देतांना क्रिडा, वर्कृत्व, एन्. सी. सी. एन्. एस. एस. आदिमुळे काही जादा मार्क दिले जातात कारण प्रोत्साहन व त्या प्रवृत्तीकडे लक्ष दिल्याने अभ्यासकडे दुर्लक्ष होते ते भरून यावे म्हणून, मग सामाजिक दुःस्थितीमुळे इच्छा असून ज्याचे अभ्यासाकडे दुर्लक्ष झाले त्याला ५ ते १० गुणांचा ग्रेस मिळाला तर मात्र एवढी ओरड कशासाठी? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे आक्षेप घेणाराकडून मिळायला हवी.

जसे प्रवेशाचे तसेच शिष्यवृत्यांचे वा सवलतींचे, मागासवर्गीयांतील आर्थिक सबलांना सवलत का द्यावी असा प्रश्न नेहमीच पुढे केला जातो. खरे म्हणजे शिष्यवृत्तीसाठी उत्पन्नाची अट आहे, कायद्याने त्यापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्यांना शिष्यवृत्ती देता येत नाही पण समजा खोटी माहिती देवून कोणी सवलत घेतली तर ती चूक आहे, ती एक दुष्परवृत्ती आहे पण ती काय फक्त दलितांमध्येच व मागासवर्गीयांत आहे का? लक्षावधी रुपये उत्पन्न असणारे लोक आपल्या देशांत उत्पन्नाचा दाखला आणून फी माफीची सवलत घेतात, मोठ्या धनाढ्य माणसाचा मुलगाही सुशिक्षित बेकार योजनेत बँकेकडून लोन घेतो? हे सर्व

चुकीचे अहे. वाईट आहे हे खरे पण त्यांतही दलितामध्ये एखाद्याने घेतलेली सवलत खुपते आणि इतरांनी केले तर त्याची चर्चाही होत नाही, ही मनांतील छुपी जातीयताच नव्हे का? आणि कायदा पाळला जात नाही म्हणून तो रद्द करावा वा सवलतीचा दुरुपयोग केला म्हणून सवलत रद्द करावयाची तर मग देशांत एकही कायदा व एकही सवलत शिल्लक ठेवता येणार नाही.

म्हणजे या एकट्या मेडिकल प्रकरणातच नव्हे तर सर्वत्र मोठे अज्ञान आणि गैरसमज आहेत आणि त्यामुळे आरक्षण विरोधी अपप्रचाराने वातावरण तापविले जात आहे. मंडल आयोगाला होणारा विरोध मूलतः आरक्षणालाच विरोध आहे.

कालेलकर आयोगाने २३९९ जाती मागास ठरविल्या तर मंडल आयोगाने ३३७६ जाती मागास ठरविल्या आहेत. लोकसंख्या वाढते पण जाती कशा वाढल्या असा ही एक आक्षेप घेतला जातो त्याचे उत्तर अतिशय सोपे आहे मंडल आयोगाने मागास जातींची राष्ट्रीय यादी केली नसून राज्यनिहाय केली आहे. त्यामुळे एक जात एकाच राज्यात मागास असली तरी सर्व राज्यांच्या यादीत व संख्येतर तिचा समावेश आहे. १९५३ साली असलेल्या राज्यसंख्येतही राज्य पुनर्रचनेमुळे दीड पट वाढ झाल्याने ही संख्या वाढलेली दिसते. उदा. पूर्वी मुंबई राज्यात मागास असलेली जात आता महाराष्ट्र व गुजरात या दोन याद्यात आल्याने संख्या वाढली. त्याचा विनाकारण बाऊ करण्याची गरज नाही.

आरक्षण धोरण ठरवा

या यादीत कदाचित चुकून काही जातींचा अनावश्यक समावेश देखिल झाला असेल पण तो समाज शास्त्रज्ञांच्या सहाय्याने दूर करता येइल त्यासाठी मात्र साऱ्या आयोगाला दोषी ठरविणे आणि त्याच्या निष्कर्षालाच आव्हान देणे हे सर्वथः चुकीचे आहे. तरी पण या शिफारशी लागू करतांना मंडल आयोग यादीत आणि राज्याच्या इतर मागासवर्गाच्या यादीत अशा दोन्ही याद्यात ज्यांचा समावेश आहे त्यानाच या सवलती देण्याचा निर्णय घोषित केला आहे. त्यामुळे अचानक व उशीरा सुरु झालेली आयोगाची, त्याच्या सदस्यांची, त्यांच्या पात्रेची चिकित्सा अनाठायीव द्वेषमूलक आहे. त्याच्या दोषांचा विचार करून निर्दोष रचनेसाठी व अंमलबजावणीसाठी एक यंत्रणा निर्माण करण्याची गरज आहे. देशाचे एक आरक्षण धोरण देखिल तयार पाहिजे कारण आरक्षणाचा आधार त्याचे निकष ते गरजूंनाच मिळण्याची व्यवस्था व त्याची अंमलबजावणी या सर्वांचा स्पष्ट विचार या धोरणांत असावा व ते केवळ राजकारणी नव्हे तर समाजशास्त्रज्जज्ञ मानववंश शास्त्रज्ञ, शिक्षण, प्रशासन शास्त्रज्ञांनी व राजकीय विचारवंतांती ठरवावे तसे झाले नाही तर साऱ्या आरक्षण व्यवस्थेलाच गैरसमज व चुकांचे कारण पुढे करून लोक विरोध करू लागतील कारण अगदीच जवळचेच उदाहरण द्यावयाचे तर पंतप्रधानांनी धार्मिक अल्पसंख्याकांना आरक्षण देण्याची म्हणजेच फाळणीला निमंत्रण देणारी घोषणा केली त्याचेच घेता येईल.

धार्मिक अल्पसंख्याना आरक्षण अनुचित

भारतीय राज्य घटनेतील आरक्षणाचा पाया हा सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या आधारावर आहे. आणि सामाजिक मागासलेपण हे हिंदु समाजातील अंतर्गत व्यथा आहे. वर्ण व जाती व्यवस्था आणि त्या आधारीत प्रतिष्ठा व संधी यामुळे झालेल्या अन्यायाची व मागासलेपणाची भरपाई म्हणून ही आरक्षण व्यवस्था जन्माला आली आहे. पण ज्या धर्मात वर्ण-जाती व्यवस्था नाही स्पृश्य-अस्पृश्यता नाही असा त्यांचा दावा आहे त्यांनी या सामाजिक आधारावर आरक्षण मागणे व ते देण्याचा पंतप्रधानांचा मनोदय हेही या स्वार्थी मतांच्या सत्ता कारणाचीच खेळी आहे. त्यामुळे हिंदु व नवबौद्ध वगळता अन्य धर्मियांना धार्मिक अल्पसंख्यक म्हणून सवलती देणे सर्वथा अनुचित आहे.

आणि आज परकीय पैशाच्या मदतीने प्रलोभन व दबावाने आणि अज्ञानाचा फायदा घेऊन जेथे धर्मांतरण होते तेथे त्यांना आरक्षण देणे म्हणजे तर परकीय पैश्याला व पर्यायाने परकीय हस्तक्षेपाला आमंत्रण देऊन देशाची अखंडता आणि एकात्मताच धोक्यात आणण्याचे काम कोणी करीत असेल तर अशा घातक प्रवृत्तीचा सर्व सामर्थ्यांनीशी विरोध करण्याची गरज आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर धार्मिक वा भाषिक अल्पसंख्यक असा आधार न ठेवता सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक आधारावर मागासलेपण ठरविण्याचीच भूमिका मंडल आयोगाची आहे तीचे ११ निकष २२ बिंदू पैकी ११ बिंदू असण्याची किमान आवश्यकता (परिशिष्ट-२ पहा) ही बहुतांषी निर्दोष रचना लक्षात घेऊन ती त्यात आवश्यक सुधारणांची व्यवस्था करून व त्या अंतर्गत आर्थिक दुर्बलांना अग्रक्रम देउन त्या शिफारशींची अंमलबजावणी झाली पाहिजे. देशात ती होणार आहे. महाराष्ट्रात ती व्हावी यासाठी सर्व शक्तीनिशी संघठीत प्रयत्न केले पाहिजेत. महात्मा ज्योतिबा फुले स्मृति शताब्दी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी वर्ष साजरे करतांना ते आपले कर्तव्यच आहे.

भाजपाचा प्रबोधनाचा संकल्प

आपला देश हा केवळ भौगोलिक भूखंड नसून एक एकात्म समाज पुरुष आहे मग त्यातले जे मागे आहेत, दुर्बल आहेत. त्यांना विशेष संधी हा त्यांचा हक्क आणि समाजाचे कर्तव्य आहे हे सर्वांनी मानले पाहिजे. प्रश्न केवळ नोकऱ्यांचा नाही प्रत्येकाला समान संधी, समान प्रतिष्ठा आणि देशाचा गाडा पुढे नेण्याच्या व्यवस्थेत समान सहभाग आहे ही भावना वास्तवात येण्याची आणि दृढ होण्याची गरज आहे, समतावादी समाज रचनेसाठी हे पुढचे पाऊल टाकलेच पाहिजे. जनता पार्टीने मंडल आयोगाच्या शिफारशींना ठराव क रून पांठिबा दिला आहे. विधानसभेत त्याचा पुरस्कार केला आहे. आणि सर्वसामान्य जनतेत जाऊन प्रबोधनासाठा प्रमाणिक प्रयत्न केले आहेत या ही पुढे प्रबोधनाची चळवळ चालू ठेवून सामाजिक परिवर्तनाचे काम एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून आम्ही करू हा संकल्प आहे. समाजाने या प्रयत्नात सहकार्य करावे अशी कळकळीची विनंती आहे.

राष्ट्रीय पुर्ननिर्माण जाती-वर्ग विहीन समाज

हे प्रबोधन जाति व्यवस्था टिकविण्यासाठी नसून ''जातिविहीन'' समतायुक्त व शोषणमुक्त समाजरचनेसाठी आहे याचे भान आम्हाला आहे. ते आपण टिकविले पाहिजे. आज दुसरा पर्याय नाहीं म्हणून जातिचा आधार आपण स्वीकारला आहे पण त्याला आर्थिक आधार जोडून जाति व्यवस्थेला पर्याय देण्याचा हा प्रयत्न आहे पण अखेर जाति व वर्ग विरहित समाज रचनेकडेच आपल्याला जावयाचे आहे. प्रतयेकाला रोजगार मिळेल, संधी व प्रतिष्ठा मिळेल व कोणताही आरक्षण वा अग्रक्रम द्यावा लागणार नाही या दिशेने राष्ट्रीय पुर्ननिर्माणासाठी सामाजिक समरसते साठी आपणास प्रयत्नांची पराकाष्ठा करावयाची आहे. पण त्या दिशेला जाताना मधे येणारे अडथळे पार करण्यासाठी काही आडवळणे घ्यावीच लागतील पण ही वळणे म्हणजे दिशा नाही हे निश्चित आणि म्हणूनच जो वंचित राहिला त्याला संधी देउन स्पर्धेसाठी समान अवस्थेला पोचेपर्यंत आरक्षण दिलेच पाहिजे. त्यासाठी काही काळ थोडे सहन करूनही आपण सर्वांनी या भूमिकेचा पुरस्कार करावा ही अपेक्षा.

मंडल आयोगाची रचना

१) श्री.बी.पी.मंडल अध्यक्ष
२) श्री.आर.आर.भोळे सदस्य
३) श्री.दिवाण मोहनलाल सदस्य
४) श्री.एल.आर.नाईक अध्यक्ष
५) श्री.के.सुब्रमण्यम्
६) श्री.एस.एस.गिले

शासनाने ठरवून दिलेले संदर्भ

१) सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग ठरविण्यासाठी निकष निश्चित करणे.
२) अशा तऱ्हेने सामाजिक व शैक्षणिक दृष्टया निशिचत केलेल्या मागासवर्गीयांच्या सुधारणेसाठी कार्यक्रम सुचविणे.
३) केंद्र आणि राज्य यांच्या सार्वजनिक सेवेसाठी व पदासाठी, नागरिकांचे अशा तऱ्हेचे मागासवर्ग, ज्यांना पुरेसे प्रतिनिधित्व नाही त्यांना भरतीसाठी व पदासाठी राखीव जागांची तरतूद करणे इष्ट आहे की नाही त्याची तपासणी करणे, आणि
४) पाहणीत ध्यानी आलेली वस्तुस्थिती आणि त्यासंबंधी योग्य वाटतील अशा शिफारशी यांचा अहवाल राष्ट्रपतींना सादर करणे.

परिशिष्ट - २

मंडल आयोगाची सामाजिक शैक्षणिक पाहणी व मागासलेपणाचे मानदंड

काका कालेलकर आयोग अहवालाच्या चर्चेच्या वेळी भारत सरकारने सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग ठरविण्यासाठी कोणतेही वस्तुनिष्ठ संशोधन न झाल्याचे नमूद केले होते. सर्वोच्चन्यायालयानेही अशा प्रकारच्या अनेक प्रकरणात खास मानदंड ठरविण्याची गरज प्रतिपादन केली होती. हे लक्षात ठेवून मंडल आयोगाने आकडेवारी जमविण्यासाठी

अनेक सूत्रांचे सहकार्य घेण्याचा निर्णय घेतला.

यासंबंधी आयोगाने केलेली सामाजिक शैक्षणिक क्षेत्रीय पाहणी अत्यंत व्यापक होती. सर्वेक्षणपत्रे तयार क़रताना तज्ञ समाजशास्त्रज्ञ आणि अन्य शास्त्रज्ञांचे सहकार्य घेण्यात आले. याशिवाय या पाहिणीच्या प्रत्येक टप्प्यात शिक्षण-क्षेत्रातील अनेक तज्ञांशी चर्चा करण्यात आली.

परिणामी आयोगाने सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाची सीमा ठरविण्यासाठी ११ मानदंड ठरविले. ११ मानदंडांचे तीन प्रमुख भागात वर्गीकरण करण्यात आले. सामाजिक शैक्षणिक व आर्थिक असे हे तीन भागहोते.

सामाजिकः

१) इतरांच्या दृष्टीने सामाजिक दृष्टया मागास समजल्या जाणाऱ्या जाती/वर्ग.

२) उपजिविकेसाठी पूर्णपणे शारीरिक श्रमावर अवलंबून असणाऱ्या जाती/वर्ग.

३) ज्या जाती/वर्गातील २५ टक्के स्त्रिया व १० टक्के पुरुष ग्रामीण भागात, १० टक्के स्त्रिया व ५ टक्के पुरुष शहरी भागात १७ व्या वर्षापूर्वीच विवाहबद्ध होत असतील अशा जाती/वर्ग.

३) ज्या जाती/वर्गातील किमान १५ टक्के स्त्रिया अधिक काम करीत असतील अशा जाती/वर्ग.

शैक्षणिकः

५) ५ ते १५ वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या मुलांची संख्या सरासरी २५ टक्के असेल अशा जाती/वर्ग.

६) ५ ते १५ वयोगटातील शिक्षण मध्येच सोडून देणाऱ्या मुलांची संख्या सरासरी २५ टक्के असेल अशा जाती/वर्ग.

७) ज्या जाती/वर्गातील एस. एस. सी. उत्तीर्णांचे प्रमाण किमान २५ टक्के पेक्षा कमी असेल. अशा जाती/वर्ग.

आर्थिकः

८) ज्या जाती/वर्गातील कुटुंबांच्या संपत्तीची सरासरी, राज्य सरासरीपेक्षा किमान २५ टक्के असेल अशा जाती/वर्ग.

९) कच्च्या घरात राहणाऱ्या कुटुंबाची संख्या राज्य सरासरीपेक्षा किमान २५ टक्के असेल अशा जाती/वर्ग.

१०) जेथे ५० टक्क्यांपेक्षा अधिक कुटुंबांना पिण्याचे पाणी अर्ध्या कि.मी. पेक्षा अधिक

अंतरावर असेल अशा जाती/वर्ग.

११) जेथे जीवनावश्यक गरजांसाठी कर्ज काढणाऱ्या कुटुंबांची संख्या राज्य सरासरीपेक्षा २५ टक्के जास्त असेल अशा जाती/वर्ग.

वरील तीन विभाग आपल्या उद्दिष्टासाठी समान महत्त्वाचे नसल्यानेप्रत्येक गटातील मानदंडांना वेगवेगळे महत्त्व दिले गेले. सामाजिक मानदंडापैकी प्रत्येकाला ३ गुण, शैक्षणिक मानदंडापैकी प्रत्येकाला २ गुण व आर्थिक मानदंडांपैकी प्रत्येकाला १ गुण अशी गुणांची विभागणी करण्यात आली होती. सामाजिक व शैक्षणिक मानदंडांबरोबर आर्थिक मानदंडही महत्त्वाचे मानले गेले, कारण सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणामुळेंच ते समोर येतात. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेला वर्ग आर्थिक दृष्टयाही मागास ठरतो हे सत्य यामुळे प्रकाशात आले. त्यामुळे या मानदंडांबद्दल समाजातील कुठल्या घटकाला आक्षेप घेण्याचे कारण नाही.

प्रत्येक मानदंडाला दिल्या गेलेल्या गुणांची एकूण संख्या २२ ठरते. राज्यातील ज्या विभागात वरील पाहणी करण्यात आली तेथे हे ११ मानदंड पारखले गेले. ज्या जातींना या २२ गुणांपैकी ११ वा त्या पेक्षाअधिक गुण मिळाले त्यांचा सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागास वर्गाच्या यादीत समावेश करण्यात आला आणि इतर सर्व जातींना ''प्रगत'' मानण्यात आले.

परिशिष्ट - ३

भारतीय घटनेत सामाजिक न्याय, योग्यता आणि विशेष अधिकार

घटनेच्या १४ च्या कलमांतर्गत, प्रत्येक भारतीय नागरिकाला अमूल्य अशा लोकशाही अधिकाराची देणगी देण्यात आली असून या अधिकारांवर १५, १६ आणि २९ व्या कलमात प्रकाश टाकण्यात आला आहे. धर्म, वर्ण, जाती, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर कोणत्याही नागरिकाशी भेदभावाची वागणूक ठेवण्यास या कलमांखाली बंधन घालण्यात आले आहे. यात नोकरी, शैक्षणिक संस्था किंवा सार्वजनिक स्थानांमध्ये प्रवेश यांचा समावेश आहे.

कोणताही समाज आपल्यातील दुर्बल, अपंग आणि मंदबुद्धी लोकांना किती संरक्षण देतो

यावर त्या समाजातील मानवता निश्चित केली जाते. जंगलामध्ये प्रत्येकजण स्वतःचे संरक्षण करतो आणि बलवान दुर्बलांना नष्ट करतो. पण विकसित समाजात मात्र अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि स्वार्थी प्रवृत्तींवर अंकुश ठेवला जातो आणि दुर्बल व गरीब वर्गाचे संरक्षण केले जाते. आपले घटनाकर्ते समाजातील दुर्बल वर्गांना संरक्षण देण्याच्या आवश्यकतेविषयी पूर्णपणे जागरूक होते. घटनेतील १५, १६ आणि २९ व्या कलमांद्वारे सर्व नागरिकांना शिक्षण, रोजगार आणि अन्य सवलती समान पद्धतीने दिल्या गेल्या आहेत. राज्य शासनात मागासवर्गीयांचे योग्य प्रतिनिधीत्व नसेल तर त्यांच्या नियुक्तीसाठी किंवा जागांचे आरक्षण करण्यासाठी या कलमातील कोणतेही उपकलम अडविणार नाही असे १६ व्या कलमातील ४ थ्या उपकलमांत स्पष्टपणे म्हटले आहे.

१९५१ मध्ये झालेल्या पहिल्या घटना दुरुस्तीत अशाच प्रकारचे एक उपलकलम १५ व्या कलमाला जोडले गेले आहे. यावरून लक्षात येते की १५ आणि १६ व्या कलमांचे चौथे उपकलम, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या विकासासाठी विशेष अधिकार देते. ४६ व्या कलमाने दुर्बल वर्गाच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंरक्षणासाठी आणि त्यांच्या विकासासाठी राज्यांना अधिकार दिला आहे.

वरवर पाहिले तर या कलमांनुसार दुर्बल वर्गाला दिले गेलेले खास अधिकार, शिक्षण आणि रोजगाराच्या मूळ अधिकारांच्या विरुद्ध आहेत असे वाटते. घटनेतील १४, १५, १६ आणि २९ व्या कलमांतर्गत प्रत्येक नागरिकाला दिली गेलेली समान संधी आणि व्यवहार, १५ आणि १६ व्या कलमांतील ४ थ्या उपकलमांमुळे कमी होते. कारण त्या उपकलमांद्वारे दुर्बल वर्गाच्या विकासासाठी विशेष सोयी करण्याचा अधिकार राज्यांना दिला आहे असा जोरदार युक्तिवाद या संबंधात केला जातो.

वास्तविक शोषितांच्या कायदेशीर अधिकारांच्या रक्षणासाठी योग्य वातावरण निर्माण केले जात नाही तोपर्यंत मुलभूत अधिकारांचे उद्दिष्टही प्राप्त होऊ शकत नाही. स्वातंत्र्यानंतर ताबडतोब शासनाने कमाल जमीन धारणा कायद्यासारखे कायदे केले पण आपले अधिकार मिळविण्याची साधने दुर्बल व गरीब शेतकऱ्यांकडे नसल्याने जमीन सुधारणेसंबंधी उपाय निरुपयोगी ठरले.

समाजातील सधन व सबल वर्ग त्यांच्यावर अत्याचार करत राहिला आणि त्याला शिक्षा मिळू शकली नाही. आपली न्याय यंत्रणा इतकी महाग आणि वेळखाऊ आहे की न्यायलयांकडून न्याय मिळविण्याइतकी सहनशक्ती समाजातील दलित व गरीब समाजाकडे नसते. अशा परिस्थितीत 'कायद्यासमोर समानता' हा भारतीय समाजाचा दावा फारसा योग्य नाही.

प्रथम मागासवर्ग आयोग

भारतीय घटनेच्या ३४० व्या कलमांतर्गत, राष्ट्रपतींच्या आदेशांन्वये, २९ जानेवारी १९५३ रोजी पहिल्या मागासवर्गीय आयोगाची स्थापना झाली. कै. काकासाहबे कालेलकर या आयोगाचे अध्यक्ष होते. कोणत्या जातीला मागास ठरवावे ही समस्या या आयोगासमोर उभी राहिली. एकत्र केलेली आकडेवारी आणि इतर माहिती पाहिल्यानंतर आयगाने मागासवर्गीच्या निश्चितीसाठी काही मानदंड ठरविले.

हिंदू समाजातील पारंपारिक जातीव्यवस्थेत कनिष्ठ दर्जाची स्थिती, जात अथवा समुदायातील बहुसंख्यांच्या शैक्षणिक विकासाच्या कमतरतेचे प्रमाण, सरकारी नोकरीत अपुरे प्रतिनिधित्व अथवा अजिबात प्रतिनिधित्व नसणे, व्यापारी, वाणिज्य आणि औद्योगिक क्षेत्रात अपुरे प्रतिनिधित्व, हे जे मानदंड होत.

या आयोगाने देशातील २३९९ मागास जाती व जमातींची यादी तयार केली आणि त्यातील ८३७ जाती, जमातींना अतिमागास वर्गात टाकले. मागासवर्गाच्या विकासासाठी या आयोगाने केलेल्या शिफारशी अत्यंत व्यापक होत्या. त्यात जमीन सुधारणा, ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुनर्गठन, भूदान आंदोलन ग्रामीण व कुटिरोद्योगांचा विकास, विद्यापीठीय शिक्षण यासारख्या अनेक क्षेत्रातील शिफारशी होत्या.

सर्व महिलांना मागासवर्गीय मानावे, मागासवर्गीयातील योग्य विद्यार्थ्यांसाठी विभित्र तांत्रिक आणि व्यावसायिक संस्थांमध्ये ७० टक्के राखीव जागा ठेवाव्या अशासारख्या काही उल्लेखनीय शिफारशी या आयोगाने केल्या होत्या. सर्व सरकारी नोकऱ्या आणि स्थानिक संस्थांत अन्य मागासवर्गीयांच्या नियुक्तिचे या आयोगाने सुचविलेले किमान प्रमाण असे होते. —

प्रथम वर्ग	-	२५ टक्के.
द्वितीय वर्ग	-	३३ १/३ टक्के.
तृतीय तथा चतुर्थ वर्ग	-	४० टक्के.

परंतु एक वैशिष्टय म्हणजे हा आयोग सर्वमान्य असा अहवाल देऊ शकला नाही. यातील ५ सदस्यांनी आपले विरोधी मत नोंदविले. डॉ.अनूपसिंह, श्री. अरुणउंगशू डे आणि श्री. पी.जी. शहा यांनी मागासलेपणाचा जातींशी संबंध जोडण्यात विरोध दर्शवला होता. जातींच्या आधारावर पदाचे आरक्षण करण्यासाही त्यांचा विरोध होता. त्याउलट श्री. डी. एस. चौरसिया यांनी ६७ पानांच्या आपल्या विरुद्ध मताच्या टीपते "जात" हा मागासलेपणाचा मानदंड मानण्याबद्दल जोरदार पाठिंबा दर्शविला होता.

आयोगाचे अध्यक्ष श्री. काका कालेलकर यांनी मात्र जवळजवळ अनिश्चित धोरण घेतले होते. त्यांनी औपचारिक विरोध दर्शविला नसला तरी राष्ट्रपतींना पाठविलेल्या पत्रात त्यांनी मागासलेपणासाठी जातीय आधार मानण्यास विरोध दर्शविला होता. आयोगाने केलेल्या काही इतर शिफारशींबद्दलही त्यांनी आपला निर्णय दिला नाही.

आयोगाने सादर केलेल्या अहवालाचा बारकाईने अभ्यास केल्यानंतर सरकारने आपल्या निवेदनासहित हा अहवाल लोकसभा व राज्यसभेसमोर ठेवला.

सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टीने मागास असलेले वर्ग ठरविण्यासाठी स्पष्ट आणि व्यावहारिक दृष्टिकोन घेतला पाहिजे आणि त्यासाठी पुढील संशोधन केले पाहिजे असे, सरकारला वाटते. मागासलेपणा दूर करण्यासाठी पूर्वीच विकास कार्यक्रमांची आखणी करण्यात आली होती. या कार्यक्रमांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने केल्यास मागासलेपणा कमी होईल की त्यासाठी ज्यास्त प्रभावी उपाययोजनेची आवश्यकता आहे याची चर्चाही या निवेदनात करण्यात आली होती. पण या आयोगाच्या अहवालावर संसदेत चर्चाच झाली नाही.

यानंतर सरकारने मागासवर्गाची निश्चिती करण्यासाठी जाती शिवाय इतर काही मानदंड ठरवता येतील का याचाही शोध घेतला, पण हे सर्व प्रयत्न असफल झाले.

शेवटी मागास वर्गाची अखिल भारतीय यादी तयार करू नये आणि अनुसूचित जाती व जमातीशिवाय इतर मागास वर्गीयांना केंद्रीय नोकरीत राखीव जागा नसाव्या असा केंद्र शासनाने निर्णय घेतला.

घटनेच्या स्वीकार केल्यानंतर या प्रकारची राष्ट्रीय पातळीवरील सर्वप्रथम पाहणी म्हणून काका कालेलकर आयोगाचा अहवाल महत्त्वाचा आहे. यानंतर १० राज्यांनी १५ आयोग स्थापन केले आणि त्यांच्या अभ्यासपूर्ण अहवालांमुळे अत्यंत मौलिक माहिती प्राप्त झाली आहे. मागास वर्गीयांना विभिन्न प्रकारच्या सोयी सवलती देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयातील आणि अनेक उच्च न्यायालयातील दिल्या गेलेल्या निर्णयांमुळे या आयोगाला बरेच सहकार्य मिळाले.

पण तरीही कालेलकर आयोगाच्या अहवालात वर्गीकरणासंबंधची आणि इतर बऱ्याच अंतर्गत त्रुटी आहे हे मान्य करावेच लागेल. वैचारिक दृष्टिकोनातून हा अहवाल इतका विस्कळीत आहे की त्याचा स्वीकार न करण्याबद्दल युक्तिवाद त्यातच मिळू शकतात.

जनतेची गरिबी दूर करणे हे शासनाच्या विकास योजनांचे प्रमुख उद्दिष्ट असल्याने आर्थिक दर्जा हा मागासलेपणाचा प्रमुख मानदंड मानण्याचा युक्तिवाद समजून घेता येतो. पण हे उद्दिष्ट कितीही कौतुकास्पद असले तरी ते घटनेच्या ३४० व्या कलमाला अनुरूप नाही. आर्थिक कसोटीवर जातींचे स्थान ठरविणे म्हणजे भारतातील सामाजिक मागासलेपणाकडे दुर्लक्ष करणे आहे.

विविध राज्यातील अन्य मागास वर्गीयांची स्थिती

१०० वर्षांपूर्वीपासून भारतातील प्रांतीय शासने समाजातील दलित व दुःखी समाजाच्या कल्याणासाठी खास कार्यक्रम आखत आहेत. १८८५ सहायक अनुदान संहिता तयार करून मद्रास सरकारने पहीले पाऊल उचलले आणि त्यामुळे दलित विद्यार्थ्यांना खास सोयी उपलब्ध करून देण्यासाठी शैक्षणिक संस्थांना नियमित आर्थिक मदत मिळू लागली. त्यानंतर १९२१ मध्ये राज्यविधानसभेने मंजूर केलेल्या एका विधेयकाची अंमलबजावणी करून सरकारी नोकऱ्यांमध्ये ब्राम्हणेतरांना अधिक प्रतिनिधित्व देण्यासाठी मद्रास सरकारने पावले उचलली. १९२७ मध्ये या योजनेवर पूनर्विचार करून आरक्षित जागांचा विस्तार करण्यात आला आणि राज्यातील सर्व जातींचे ५ वेगवेगळे भाग करून प्रत्येक भागासाठी वेगळा कोटा ठरवून देण्यात आला.

दलीत जातींकडून वारंवार आलेल्या निवेदनामुळे म्हैसूरच्या महाराजांनी सरकारी नोकऱ्यात ब्राम्हणेतरांना योग्य प्रतिनिधित्व देण्याबद्दल योजना सुचविण्यासाठी तत्कालीन उच्च न्यायाधीश मिलर यांच्या अध्यक्षतेखाली १९२१ मध्ये एक समिती नियुक्त केली. या समितीच्या अहवालाच्या आधारावर म्हैसूर सरकारने १९२१ मध्ये राज्य सरकारच्या नोकऱ्यांमध्ये मागास वर्गासाठी खास सोयी उपलब्ध करून देण्यासंबंधी आदेश दिले.

मागासवर्गीयांचा शोध घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रगतीसाठी खास सवलतींच्या शिफारशीसाठी मुंबई सरकारने १९२८ मध्ये स्टाटे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या अहवालानें मागास वर्गांचे तीन भागात विभाजन केले. दलित, आदिवासी व गिरीवासी जमाती आणि इतर मागासवर्गीय असे हे विभाजन होते. या तीन भागांना शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यात खास स वलती देण्यात याव्या अशी शिफारसही समितीने केली.

दलित वर्गाच्या विकासाचे अखिल भारतीय पातळीवर प्रयत्न करण्याचे श्रेय १९१९ मध्ये मॉटेंव्यू चेम्सफोर्ड रिफॉर्मकडे जाते

स्वातंत्र्योत्तर काळात अन्य मागासवर्गीयांना विकासासाठी अधिक सवलती देण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने त्यांची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास असलेल्यांच्या विकासासाठी खास मोहीम आखण्याची सोय घटनेच्या १५ (४) व १६ (४) या कलमांनुसार आहे. याच दृष्टीने ३४० या कलमांतर्गत केंद्र शासनाने १९५३ मध्ये कालेलकर समिती स्थापन केली. पण या समितीच्या शिफारशी मान्य न करता केंद्र शासनाने आपल्या मानदंडाच्या आधारावर राज्य सरकारांनी मागासवर्गीयांची यादी बनवावी आणि यासंबंधी आवश्यक ती कारवाई करावी अशा सूचना दिल्या.

त्यामुळे अनेक राज्य सरकारांनी मागासलेपणाची व्याख्या ठरविण्यासाठी आणि मागासलेपणा दूर करण्यासाठी स्वतःच्या समित्या स्थापन केल्या.

राज्य सरकारांनी अशा १५ समित्या स्थापन केल्या यात आंध्र प्रदेश, बिहार, गुजरात, जम्मू-काश्मीर, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, पंजाब, उत्तर प्रदेश व तामिळनाडू या राज्यांचा समावेश आहे.

आंध्र प्रदेश

आंध्र प्रदेशाने १९६६ मध्ये ११२ अन्य मागास वर्गाची यादी केली आणि शासकीय नोकऱ्या व व्यावसायिक शैक्षणिक संस्थांतून त्यांच्यासाठी जागा राखीव ठेवण्याचाआदेशही दिला. या आदेशाविरुद्ध अनेक अर्ज आले आणि यादीतील जातींच्या सामाजिक व शैक्षणिक मागासपणाविषयींचे योग्य ते पुरावे राज्यशासनाने दिले नाहीत असे सांगून आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने हा आदेश रद्द केला. सर्वोच्च न्यायालयानेही या निर्णयावर शिक्कामोर्तब केले.

ही पार्श्वभूमी लक्षांत घेऊंन आंध्र प्रदेश सरकारने मनोहर प्रसादांच्या अध्यक्षतेखाली एप्रिल १९६८ मध्ये मागास वर्ग आयोग स्थापन केला. या आयोगाने अन्य मागासवर्गीयांचे चार भागात विभाजन केले आणि त्यांच्यासाठी व्यावसायिक शिक्षण संस्था व सरकारी नोकऱ्यात राखीव जागांची शिफारस केली. त्याप्रमाणे आदिवासी जाती व जमातींसाठी ७ टक्के, व्यावसायिक गटांसाठी १० टक्के, धर्मांतरित हरिजनांसाठी १ टक्का व इतर वर्गांसाठी ७ टक्के अशा एकूण २५ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या.

खुल्या स्पर्धेत निवडल्या गेलेल्या मागास वर्गीयांची गणना या राखीव जागांमध्ये करू नये ही आयोगाची शिफारसही आंध्र प्रदेश शासनाने मान्य केली. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासनाधीन उपक्रमांमध्ये २५ टक्के जागा राखीव केल्या.

घरबांधणीसाठी जागा २५ टक्के आणि गृहनिर्माण मंडळाने बांधलेल्या इमारतीमध्ये १५ टक्के राखीव कोटा मागासवर्गीयांसाठी ठेवला. वार्षिक उत्पन्न ६००० रु. पेक्षा कमी असलेल्या मार्गासवर्गीयांच्या मुलांना फी माफी आणि शिष्यवृत्त्या वसतीगृहे आदि सोयीही दिल्या आहेत.

अन्य मागासवर्गीयांना गृहबांधणीसाठी जादा जागेचे वाटप आणि त्यांच्यासाठी वेगळे आर्थिक महामंडळ स्थापण्याची, तसेच पूर्णपणे आर्थिक पायावर इतर शिष्यवृत्त्या व अन्य सवलती देण्याची आयोगाची शिफारस शासनाने स्वीकारली.

त्यानंतर अन्य मागासवर्गाच्या कल्याणासाठी आणि उपायांच्या शिफारशीसाठी वीरप्पा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन झाली. १९७७ साली या समितीने सादर केलेल्या अहवालात खालील महत्त्वाच्या शिफारशी आहेत.

अ) सध्या सहावीपासून सुरू होण्याऱ्या शिष्यवृत्त्या पहिलीपासून दिल्या जाव्या.

ब) शिष्यावृत्त्यांची रक्कम वाढवावी.

क) मागासवर्गीयांसाठी वेगवेगळ्या संस्थांमध्ये प्रवेशसाठी असणारी किमान गुणांची टक्केवारी ४० वरून ३५ वर आणावी.

बिहार:

बिहार शासनाने जून १९७१ मध्ये मुंगेरीलाल यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्ग आयोग स्थापन केला. १९७६ मध्ये सादर केलेल्या अहवालात या आयोगाने १२८ जातींची मागासवर्गात आणि त्यातील ९४ जातींची अती मागास वर्गात गणना केली.

या आयोगाच्या प्रमुख शिफारशी खालीलप्रमाणे होत्याः-

अ) सर्व सरकारी विभाग, स्थानिक संस्था आणि सरकारी उपक्रमांमध्ये अन्य मागासवर्गीय उमेदवारांसाठी २० टक्के राखीव जागा याशिवाय महिलांसाठी आणि आर्थिक दृष्टया मागासलेल्यांसाठी प्रत्येकी ३ टक्के जागा राखीव, ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न किमान आयकर सीमेपेक्षा कमी असेल अशांनाच हा लाभ मिळेल.

ब) तांत्रिक, वैद्यकीय महाविद्यालये आणि इतर व्यावसायिक शिक्षणसंस्थांतून २४ टक्के जागांचे आरक्षण आणि —

क) राहत्या जागेचे वाटप, शिष्यवृत्त्यांची मंजुरी प्रशिक्षण फी इत्यादिबाबत सवलती.

राज्य सरकारने या शिफारशी स्वीकारल्या आणि ऑक्टोबर १९७८ मध्ये लागू केल्या. पण त्यामुळे बरीच आंदोलने झाली. उच्चवर्णीय आणि मागासवर्ग दोघेही नाराज झाले. आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीमुळेही अनेक वाद निर्माण झाले. जुलै. १९७५ मध्ये शासनाने अनेक गैरसमजुती दूर केल्या.

गुजरात:

गुजरात सरकारने बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली १९७२ मध्ये एक मागास वर्ग आयोग स्थापन केला. १९७६ मध्ये या आयोगाने सादर केलेल्या अहवालात सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्गाच्या ८२ जाती व जमातींची यादी केली आणि त्यांच्या विकासासाठी खालील शिफारशी केल्या —

१) वैद्यकीय, तांत्रिक श्रेणीच्या सर्व सरकारी नोकऱ्यात १० टक्के राखीव जागा.

२) तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या सर्व सरकारी नोकऱ्यात १० टक्के राखीव जागा.

३) सर्व सरकारी, स्थानिक संस्था व शासनाधीन उपक्रमातील प्रथम व द्वितीय श्रेणीच्या नोकऱ्यातील ५ टक्के राखीव जागा.

४) प्रशिक्षण व उत्पादन केंद्रात १० टक्के राखीव जागा.

५) वार्षिक उत्पन्न ४,८०० रु. पेक्षा कमी असलेल्यांच्या मुलांसाठी शिष्यवृत्त्या व शैक्षणिक सवलती. भटक्या व विमुक्त जमातींसाठी वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा ७,२०० रु. असावी.

गुजरात सरकारने बक्षी आयोगाच्या सर्व शिफारशी स्वीकारल्या.

जम्मू-काश्मीर:

१९५६ मध्ये जम्मू-काश्मीर सरकारने एका अधिसूचनेद्वारे मागास वर्गीयांसाठी सरकारी नोकऱ्यात आरक्षण करण्याची सोय उपलब्ध करून दिली. नोव्हेंबर १९६७ मध्ये गजेंद्रगडकर आयोगाची स्थापना करून विभिन्न जातींना आणि मागासवर्गीयांना सरकारी नोकऱ्यात योग्य ते प्रतिनिधित्व मिळावे यासाठी उपाय सुचविण्याची सूचना आयोगाला दिली. डिसेंबर १९६८ मध्ये दिलेल्या अहवालात आर्थिक मागासलेपण, व्यवसाय, साक्षरता आणि जातींच्या आधारावर मागास वर्गीयांची यादी निश्चित करावी अशी शिफारस आयोगाने केली. हे कार्य उच्च पातळीवरील समितीकडे सोपविण्याची शिफारसही आयोगाने केली.

त्याप्रमाणे १९६९ मध्ये शासनाने एक मागासवर्गीय समिती स्थापन केली. या समितीने गजेंद्रगडकर आयोगाच्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी कांही नियम केले. पण या नियमांमध्ये बदल करावे असा आदेश उच्च न्यायालयाने दिला. त्याप्रमाणे न्यायमूर्ती आदर्श आनद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या समितीने आपला अहवाल दिला.

अहवालातील शिफारशींनुसार २२ दुर्बल आणि शोषित जातींना तसेच उल्लेखित मागासक्षेत्रात राहणाऱ्यांना राज्यातील मागास वर्ग म्हणून जाहीर करावे अशी सूचना होती.-

दुर्बल आणि शोषितांमध्ये प्रामुख्याने व्यावसायिक जाती असतात. दुर्गम भाग, वाईट हवामान, कमाल निरक्षरता आणि आरोग्य विषयक सोयींची अनुपलब्धता यावर मागास क्षेत्रांची निवड करण्यात आली.

समितीने राज्यातील मागासवर्गीयांसाठी खालील सवलतींची शिफारस केली.

अ) सर्व सरकारी नोकऱ्यातील रिकाम्या जागांपैकी ४२ टक्के आरक्षण.

ब) सर्व तांत्रिक आणि व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमध्ये ४२ टक्के आरक्षण.

क) ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ हजार रु. पेक्षा कमी असेल अशा कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या व आर्थिक मदत देणे.

अनुसूचित जातींसाठी असलेल्या ८ टक्के आरक्षणाशिवाय नोकऱ्या व शैक्षणिक संस्थांमधील वरील आरक्षण आहे.

कर्नाटक:

कर्नाटक शासनाने श्री. हवानूर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या मागासवर्ग आयोगाने आपला अहवाल १९७५ मध्ये सादर केला. सामाजिक मागासलेपणा ठरविण्यासाठी जात हा मानदंड न मानता या आयोगाने आर्थिक, गृह आणि व्यवसाय या सारख्या बाबी मानल्या. मागासवर्गाला तीन भागांत विभाजित करून या आयोगाने राज्यातील त्यांच्या लोकसंख्येची टक्केवारी काढली आणि त्यांना सरकारी नोकऱ्यांत खालीलप्रमाणे आरक्षण सुचविले — मागास समुदायासाठी १६ टक्के, मागास जातींसाठी १० टक्के, आणि मागास जमातींसाठी ६ टक्के याप्रमाणे एकूण ३२ टक्के आरक्षण.

शैक्षणिक संस्थांमध्येही अशाच प्रकारे आरक्षणाची शिफारस आयोगाने केली.

अन्य मागास वर्गासाठी एक वेगळे आर्थिक महामंडळ आणि एक मंत्रालय स्थापन करण्याची शिफारसही यात होती.

राज्य सरकारने सामान्यपणे आयोगाच्या शिफारशी मान्य केल्या.

केरळ:

केरळ सरकारने अन्य मागास वर्गांसाठी आतापर्यंत तीन आयोग स्थापन केले. पहिल्या शिवनाथन समितीने खालील शिफारशी केल्याः—

१) तांत्रिक व व्यावसायिक महाविद्यालयांत अन्य मागासवर्गीयांसाठी जागा राखीव आणि अनुसूचित जाती व जमातींसाठी १० टक्के राखीव जागा.

२) राज्य शासनातील सर्व नवीन नियुक्त्यांना वरील योजना लागू, आणि —

३) मागास वर्गीयांच्या पुनवर्गीकरणावर विचार करण्यासाठी तज्ज्ञांच्या समितीची स्थापना. अन्य मागासवर्गातील विद्यार्थ्यांसाठी फक्त २५ टक्के आरक्षण मान्य करून केरळ सरकारने वरील शिफारशी स्वीकारल्या.

त्यानंतर शैक्षणिक संस्थांतील जागांच्या आरक्षणांना घटनेतील १५ (४) कलमानुसार केरळ उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. मागासवर्गांना शैक्षणिक फायदे देण्यासाठी योग्य मानदंड ठरवावे असा आदेश उच्च न्यायालयाने केरळ शासनाला दिला. त्याप्रमाणे शासनाने पिल्ले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या आयोगाने खालील शिफारशी केल्या —

१) आयोगाने ९१ जातींना मागास वर्गाच्या यादीत समाविष्ट केले आणि अहवालात सुचविलेल्या सवलती ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ४,२०० रुपयांपेक्षा कमी असेल अशा कुटुंबातील सदस्यांना मिळाव्या अशी शिफारश केली.

२) तांत्रिक व व्यावसायिक संस्थांमध्ये अन्य मागासवर्गांसाठी २५ टक्के जागा राखीव असाव्या आणि या वर्गातील वेगवेगळ्या वर्गासाठी — वेगवेगळा कोटा ठरवून द्यावा. कमाल वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ६ हजार रुपयांपर्यंत वाढवून राज्य सरकारने वरील शिफारशी स्वीकारल्या.

मागास समुदायाच्या आरक्षणाचे नियम जुन्या आकड्यांवर आधारित होते आणि वेळोवेळी व्यापक पाहणी करून आकडेवारी एकत्र करावी अशी सूचना उच्च न्यायालयाने राज्य सरकारला केली. त्याप्रमाणे सरकारने दामोदरन यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन केला. या आयोगाच्या अहवालाची पाहणी करण्यासाठी अधिक वेळ लागल्याने अहवालातील निष्कर्ष जुने झाले आणि एक नवी समिती स्थापन करण्याचा निर्णय केरळ सरकारने घेतला. पण अद्याप कोणतीही समिती स्थापन करण्यात आली नाही.

महाराष्ट्र:

श्री. बी.डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या समितीने आपल्या अहवालात खालील शिफारशी केल्या —

१) मागासवर्गांचे अनुसूचित जाती आणि नवबौद्ध अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जाती आणि अन्य मागास वर्ग असे चार भागात विभाजन केले पाहिजे.

२) राज्यात मागास वर्गीयांच्या वेगवेगळ्या वर्गाच्या लोकसंख्येनुसार शैक्षणिक संस्थात आणि नोकऱ्यात त्यांच्या आरक्षणाची टक्केवारी ठरविली पाहिजे.

शासनाने सर्वसामान्यपणे वरील शिफारशी मान्य केल्या आणि मागास वर्गातील ४ वर्गासाठी नोकऱ्या व शैक्षणिक संस्थांमध्ये खालीलप्रमाणे आरक्षण केले. —

१) बौद्ध धर्म स्वीकारलेल्या सह अनुसूचित जाती १३ टक्के.

२) अनुसूचित जमातींसाठी ७ टक्के,

३) भटक्या व विमुक्त जमातींसाठी ४ टक्के आणि

४) अन्य मागास जातींसाठी १० टक्के.

त्यानंतर एप्रिल १९७९ मध्ये जारी केलेल्या आदेशानुसार राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील एकूण रिक्त जागांपैकी ८० टक्के जागा, आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवल्या गेल्या. ज्यांचे मासिक उत्पन्न २०० रु. पेक्षा कमी असेल अशांची गणना या दुर्बल घटकात करण्यात आली होती. अशा प्रकारच्या व्यक्ती उपलब्ध नसल्यास २०० ते ४०० रु. मासिक उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील सदस्यांना या जागा प्राथमिकतेने दिल्या जाव्या.

या ८० टक्के राखीव जागांमध्ये अन्य मागास वर्ग, अनुसूचित जाती व जमातींसाठी राखीव ठेवलेल्या जागाही समाविष्ट असल्याचे या आदेशात स्पष्ट करण्यात आले होते. पण या आर्थिक तरतुदी कधीच अंमलात आल्या नाहीत.

पंजाब:

पंजाब सरकारने मागास वर्गासाठी १९५१ मध्ये एक समिती स्थापन केली. या समितीच्या शिफारशींप्रमाणे ९ राज्यातील एकूण लोकसंख्येच्या २ टक्के असणाऱ्या १४ जातींना अन्य मागासवर्गात दाखल करण्यांत आले. आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक मागासलेपणाच्या आधारे ही यादी करण्यात आली होती. या आयोगाच्या शिफारशींनुसार सरकारी नोकऱ्यातील २ टक्के जागा मागास वर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या. शैक्षणिक संस्थांतही हीच सवलत दिली गेली.

मागासवर्गांना दिलेल्या सवलतींची पाहणी करण्यासाठी १९६५ मध्ये राज्यसरकारने श्री वृषभान यांच्या अध्यक्षतेखाली एक मूल्यांकन समिती स्थापन केली. ऑगस्ट १९६६ मध्ये सादर केलेल्या अहवालात या समितीने खालील शिफारशी केल्या —

१) मागासवर्गांच्या यादीचे आधुनिकीकरण करून अद्याप मागास नसलेल्या जाती व वर्ग या यादीतून काढून टाकावे, व —

२) शैक्षणिक संस्थांमध्ये सध्या असलेल्या २ टक्के राखीव जागांऐवजी ५ टक्के राखीव जागा असाव्या.

नोकऱ्यामधील आरक्षणामुळे काहीच उद्दिष्ट प्राप्त होत नाही असे आयोगाच्या लक्षांत आल्याने सरकारने प्रामुख्याने शैक्षणिक सवलती द्याव्या अशी सूचनाही त्यांनी केली. सरकारी नोकऱ्यातील आरक्षण रद्द करण्याची समितीची शिफारस शासनाने अस्वीकृत केली. आणि नोकऱ्यात व शैक्षणिक संस्थांत आरक्षणांचे प्रमाण २ टक्क्यावरून ५ टक्क्यांपर्यंत वाढविले.

१९७५-७६ सालातील चौथ्या अहवालात पंजाब विधानसभा समितीने अन्य मागास वर्गांसाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये १५ टक्के आरक्षण असावे अशी शिफारस केली. या शिफारशीवर विचार केल्यावर राज्य शासनाच्या लक्षात आले की. अनुसूचित जातींसाठी १५ टक्के आणि माजी सैनिकांसाठी २० टक्के जागा यापूर्वीच आरक्षित आहेत. कमाल आरक्षणाची मर्यादा ५० टक्के असल्याने मागास वर्गासाठी वेगळे १५ टक्के आरक्षण शक्य नव्हते.

उत्तर प्रदेश:

श्री. छेदीलाल साथी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या मागासवर्ग समितीने आपल्या अहवालात मागासवर्गाचे तीन भागात विभाजन करण्याची शिफारश केली आणि प्रत्येक श्रेणीच्या सरकारी नोकऱ्यांत आरक्षणाचा वेगवेगळा कोटा ठरवून दिला.

१) भूमीविहीन मजूर, अकुशल कामगार, घरगुती नोकर यांची 'ए' यादी १७ टक्के.

२) मध्यम व लहान शेतकऱ्यांची यादी 'बी' १० टक्के.

३) मुस्लिम मागासवर्ग समाविष्ट केलेली 'सी' यादी २।। टक्के.

वरील आधारावर शैक्षणिक संस्थांमध्येही आरक्षण करण्याची सूचना देऊन आयोगाने गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्राथमिकता देण्याची शिफारस केली. या शिफ़ारशीपैकी काही उत्तर प्रदेश सरकारने स्वीकारल्या आणि सरकारी नोकऱ्यातील १५ टक्के जागांचे मागासवर्गासाठी आरक्षण करण्याचा आदेश दिला. असेच आरक्षण तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण संस्थातही केले गेले. त्यानंतर १९७९ मध्ये उच्च न्यायालयाने हा आदेश रद्द केला आणि आता हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या विचाराधीन आहे.

तामिळनाडू:

अन्य मागास वर्गाला खास सवलती देण्यात तामिळनाडूचा पहिला क्रमांक आहे. १९२७ पासून मद्रास सरकारने या सवलती सुरू केल्या. १९४७ मध्ये मागास वर्गाच्या वाढत्या दडपणामुळे सरकारने त्यांचे प्रतिनिधित्वात बदल केले. आरक्षणाची ही योजना सर्वोच्च न्यायालयाने रद्द केली आणि यापुढे हे आरक्षण फक्त अनुसूचित जाती व मागास वर्गासाठीच असावे असा निर्णय १९५१ मध्य राज्य सरकारने घेतला. आंध्र प्रदेश अलग झाल्यानंतर मद्रास सरकारने सर्व जागांमध्ये अनुसूचित जाती व जमातींसाठी १६ टक्के आणि मागासवर्गासाठी २५ टक्के आरक्षण करण्याचा आदेश दिला. वैद्यकीय महाविद्यालयात अनुसूचित जाती व जमातींसाठी १५ टक्के व मागास वर्गासाठी २५ टक्के जागा राखीव ठेवण्याचे आदेश जारी झाले.

१९६९ मध्ये श्री. ए. बी. सत्तानथन यांच्या अध्यक्षतेखाली तामिळनाडूने एक मागासवर्ग आयोग नेमला. त्याच्या मुख्य शिफारशी खालीलप्रमाणे आहेत. —

१) मागासवर्गाच्या तयार याद्यांमध्ये संशोधन करून त्यांचे नूतनीकरण करावे.

२) अन्य मागास वर्गाच्या उमेदवारांसाठी राज्य सरकारच्या नोकऱ्यांत ३३ टक्के आरक्षण असावे.

३) विभिन्न व्यावसायिक व तांत्रिक शैक्षणिक संस्थांमधील प्रेवशासाठीही वरील आरक्षण असावे.

४) अन्य मागास वर्गातील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या शैक्षणिक सवलती दिल्या जाव्या.

या शिफारशी आणि अन्य बाबींचा विचार करून राज्य सरकारने मागास वर्गासाठी ३१ टक्के आणि अनुसूचित जाती व जमातींसाठी १८ टक्के जागा राखीव ठेवण्याचे आदेश दिले. या दोन वर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संस्थांतून ३१ टक्के व १८ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या.

जानेवरी १९८० मध्ये सरकारी नोकऱ्यात व शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणाचे प्रमाण ३१

टक्क्यांवरून ५० टक्क्यांवर नेण्यात आले. अनुसूचित जाती व जमातींच्या १८ टक्के कोट्याशिवाय हा कोटा आहे. या निर्णयाविरुद्ध एक अर्ज तामिळनाडू उच्च न्यायालयात विचाराधीन आहे.

मागास वर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, दुपारचे मोफत भोजन, गणवेश, पाठ्यपुस्तके इत्यादी मदत तामिळनाडू शासनही देते. त्यांच्यासाठी वेगळी वसतीगृहे आणि खास शैक्षणिक सोयीही करण्यात आल्या आहेत. व्यावसायिक समूहांना कमी किंमतीत हत्यारेही पुरविण्यात येतात.

जानेवरी १९८० मध्ये सरकारी नोकऱ्यात व शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणाचे प्रमाण ३१ टक्क्यांवरून ५० टक्क्यांवर नेण्यात आले. अनुसूचित जाती व जमातींच्या १८ टक्के कोट्याशिवाय हा कोटा आहे. या निर्णयाविरुद्ध एक अर्ज तामिळनाडू उच्च न्यायालयात विचाराधीन आहे.

उपरोक्त १० राज्यातील या व्यापक सवलतींचा हा आढावा पाहिला म्हणजे मंडल आयोग व त्याच्या शिफारशी ही नवी गोष्ट नाही तर उर्वरित राज्यांत आणि केंद्रात याच कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे हे सहज पटण्यासारखे आहे.

परिशिष्ट - ६

आयोगाने आकडेवारीसाठी केलेल्या गोष्टी

कालेलकर आयोगाने सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासल्या वर्गाचे वर्गीकरण करण्याचे निश्चित मानदंड सुचविले नाहीतआणि वस्तुनिष्ठ शोध ही घेतला नाही. या आयोगाच्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या नाहीत त्याचे हेच कारण आहे.

म्हणूनच मंडल आयोगाने आपल्या कामाची रूपरेषा तयार करतांना सर्वआवश्यकतांवर लक्ष ठेवले, आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपल्या कामात देशातील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ, संशोधन संस्था आदिचे सहकार्य मिळविले. एखाद्या दुसऱ्या प्रतिष्ठित शोधतंत्रावर विश्वास ठेवण्याऐवजी मंडल आयोगाने वास्तवतेचा शोध घेण्याच्या दृष्टीने आपले कामाचे जाळे दूरवर पसरविण्याचे प्रयत्न केले. आयोगाने २१ मार्च १९७९ ला सामाजिक मागासलेपणावर एक परिसंवाद आयोजित केला आणि त्यानंतर लगेच आयोगाच्या विनंतीनुसार दिल्ली विद्यापीठाच्या मानव शास्त्र विभागाने यासंबंधी दोन दिवसांचा परिसंवाद घेतला. यामुळे शैक्षणिक विभागाकडून आयोगाला सतत सहकार्य मिळत गेले.

याशिवाय तीन प्रश्नपत्रिका तयार करून आयोगाने त्या सर्व राज्य सरकारे, केंद्रीय मंत्रालये

आणि सामान्य जनतेला पाठविल्या. राज्यसरकारांना पाठविलेल्या प्रश्नावलीत सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाविषयीची शासनाची भूमिका अन्य मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी शासनाने राबविलेल्या विविध योजना, सरकारी नोकऱ्यात अन्य मागासवर्गीयांचे प्रमाण, शारीरिक श्रम करणारे मजूर आणि व्यवसायकरणाऱ्या समुदायांची आर्थिक पातळी व सामाजिक स्थिती, शैक्षणिक पातळीइत्यादिसंबंधी माहिती मागाविण्यात आली होती.

केंद्रीय मंत्रालयांना पाठविलेल्या प्रश्नावलीत त्यांच्या खात्यात्त असणाऱ्या अन्य मागासवर्गीय कर्मचाऱ्यांची संख्या आणि प्रमाण यांची माहिती मागविली होती तर सर्वसामान्य जनता व संघटना यांच्यासाठी असलेल्या प्रश्नावलीत सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाचे मानदंड, स्वातंत्र्यानंतरची सामाजिक स्थिती भारतीय समाजातील जातींचे स्थान, मागासवर्गीयांच्या अडचणी या विषयांवर त्यांचे विचार मागविले होते.

वरील तिन्ही प्रश्नावलींमधून मिळालेली माहिती व्यवस्थित पद्धतीने एकत्र करून तिचे विश्लेषण करण्यात आले आणि तिचा उपयोग या अहवालात करून घेण्यात आला.

सामाजिक व शैक्षणिक मागासपणामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांबद्दल जनतेतील विविध पातळीवरून आणि वर्गाकडून, सरळ माहिती मिळविण्याच्यादृष्टीने आयोगाने व्यापक दौरे केले. या दौऱ्यात ८४ जिल्हाकार्यालये व ३७ गावांना भेटी देऊन आयोगाच्या सदस्यांनी मुख्यमंत्री, मंत्री सरकारी अधिकारी, लोकप्रतिनिधी सामाजिक संस्थांशी विचारविनिमय केला. त्यामुळे मागासवर्गाची दुःखे व परिस्थती यांचा बारकाईने अभ्यास करण्याची आणि विविध वर्गातील जनतेचे यासंबंधीचे विचार जाणून घेण्याची संधी आयोगाला मिळाली.

देशव्यापी सामाजिक शैक्षणिक पाहणी करण्याच्या दृष्टीने आयोगाने १५ विशेषज्ञांची एक समिती स्थापन केली. या समितीने पाहणीसाठी आवश्यक असणारी आकडेवारी, नमुना पत्रिका इत्यादींची तयारी केली.

दक्षिणेतील राज्यांनी अन्य मागासवर्गीयांच्या विकासासाठी उत्तरेकडील राज्यांपेक्षा अनेक पटीनी अधिक काम केले आहे. बिहार उत्तर प्रदेश येथे आरक्षण विरोधी आंदोलने झाली. याचा अभ्यास करण्यासाठी स्थानिक कारणे, सामाजिक प्रवृत्ती यांच्या स्पष्ट माहितीसाठी आयोगाने मुंबईतील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे सहकार्य घेतले. त्यामुळे आयोगाच्या शिफारशी एका शास्त्रशुद्ध आणि भक्कम पायावर उभ्या आहेत.

याशिवाय भारतीय मानव विज्ञान संस्था, श्रम मंत्रलय, आर्थिक विकास संस्था यांच्या विविध अहवालांचा उपयोगही आयोगाने केला. मागासवर्गीयांचे आरक्षण, नोकऱ्यांचे वितरण इत्यादींच्या संबंधी विविध न्यायालयांनी दिलेल्या घटनात्मक आणि कायदेशीर निर्णयांचा उपयोगाही आयोगाने करून घेतला.

मंडल आयोगाच्या शिफारशी

अन्य मागासवर्गीयांचा विकास हा 'गरीबी हटाव' सारख्या व्यापक राष्ट्रीय प्रश्नाचाच एक भाग आहे. या अन्य मागासवर्गीयांना विकासापासून दूर ठेवणे हा सर्वात मोठा राजकीय प्रश्न आहे. इथे मूळ प्रशन सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाचा असून त्यांची गरिबी हा जातीवर आधारलेल्या बंधनांचा परिणाम आहे. ही बंधने सामाजिकव्यस्थेशी जोडली गेली असल्याने ती तोडण्यासाठी समाजरचनेतच व्यापक परिवर्तनाची आवश्यकता आहे. यासाठी शासनाने उचललेल्या पावलांचे महत्त्व फार मोठे आहे.

राखीव जागा:

१ अन्य मागासवर्गीयांसाठी सरकारीनोकऱ्यात आणि शैक्षणिक संस्थांमध्ये राखीव जागा ठेवण्यात शासनाचा बदलेला दृष्टीकोनच दिसून येतो. अन्य मागासर्गाची मोठी लोकसंख्या (५२ टक्के) पाहता राखीव जागांवर दरवर्षी काही हजार मागासवर्गीयांना नोकऱ्या देऊन त्यांच्या सर्वसाधारण परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही असा युक्तिवाद केला जातो. याबरोबरच राखीव जागांवर मोठ्या प्रमाणात कर्मचारी ठेवले तर सरकारी सेवेची पातळी आणि कार्यकुशलता यांच्यावर परिणाम होईल असेही सांगितले जाते. अन्य मागासवर्गीयातील जे काहीजण पुढारले आहेत त्यांनांच या राखीव जागांचा फायदा मिळेल आणि खरोखर मागासलेले तसेच राहतील अशी भीतीही व्यक्त करण्यत येते. योग्य उमेदवारांना राखीव जागांमुळे नोकऱ्या न मिळाल्याने त्यांच्या मनात द्वेष निर्माण होईल असाही एक युक्तिवाद आहे.

२) वरील सर्व युक्तिवाद तर्काधिष्ठित असले तरी आपल्य सवलती कायम रहाव्यात अशी इच्छा असणाऱ्या काही ठराविक प्रशासकांकडून ते आले आहेत. यामुळे हे सर्वच युक्तिवाद एकांगी दृष्टीकोनातून होणारे आहेत. काही तात्कालिक महत्त्वाच्या प्रश्नांवर विचार करताना राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांची अशी उपेक्षा केली जाते.

आर्थिक मदत

१ औद्योगीकरणामुळे पिढीजात व्यवसाय करणाऱ्या समाजाचा फार मोठा तोटा झाला आहे. यांत्रिक उत्पादन आणि कृत्रिम सामुग्रीमुळे ग्रामीण कुंभार, तेली, लोहार, सुतारइत्यादींची उदरनिर्वाहाची पिढीजात साधने बेकार झाली आणि खेड्यातील हा वर्ग पूर्णपणे गरीब झाला.

२) म्हणून ग्रामीण भागातील जे लोक आपला लघु उद्योगस्थापन करू इच्छितात त्यांना योग्य ती आर्थिक मदत आणि यांत्रिक सहकार्य देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अन्य मागासवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी खास व्यावसायिक प्रशिक्षण घेतले असेल त्यांनाही अशीच मदत दिली गेली पाहिजे.

३) वास्तविक अनेक राज्य शासनांनी लघु आणि मध्यमउद्योगांच्या विकासासाठी आर्थिक आणि तांत्रिक एजन्सी स्थापन केल्या आहेत. पण समाजातील काही ठराविक व्यक्तीच त्यांचा फायदा घेतात ही उघड गोष्ट आहे. हे लक्षांत घेऊन मागासवर्गासाठी वेगळी आर्थिक आणि तांत्रिक मदत देणारी संस्था स्थापन केली पाहिजे. कर्नाटक आणिआंध्र प्रदेशाने यापूर्वीच मागासवर्गीयांसाठी वेगळी आर्थिक महामंडळे स्थापन केली आहेत.

४) व्यावसायिक गटांच्या सहकारी संस्थाही या बाबतीत उपयोगी ठरू शकतील. मात्र या संस्थातील सर्व पदाधिकारी आणि सभासद पिढीजात व्यावसायिक गटातील असतील. आणि बाहेरचे लोक या संस्थात घुसून त्यांचे शोषण करणार नाहीत. याची काळजी घेतली गेली पाहिजे.

५) देशातील औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रात अन्य मागासवर्गीयांचा सहभाग नगण्य आहे. त्यांच्या किमान आर्थिक पातळीचे हे द्योतक आहे. त्यांच्या संपूर्ण विकासाठी सर्व राज्य सरकारांनी अन्य मागासवर्गीयांमध्ये व्यापारी आणि औद्योगिक विकासाठी वेगळ्या आर्थिक आणि तांत्रिक संस्थांचे जाळे निर्माण केले पाहिजे.

शैक्षणिक सवलती

१ वेगवेगळी राज्य सरकारे अन्य मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी शुल्कांत सूट, मोफत पुस्तके आणिकपडे, दुपारचे जेवण, वसतीगृहाच्या खास सवलती, शिष्यवृत्त्या अशाप्रकारच्या अनेक सोयी देत आहेत. पण या सवलती पुरेशा नाहीत. यासाठी फक्त पुरेशी आर्थिक सोय करून देऊन चालणार नाही तर खऱ्या अर्थाने उद्देशपूर्ण शिक्षणासाठी वातावरण निर्मितीसाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी योजना राबवाव्या लागतील.

२) अतिमागासवर्गीय विद्यार्थी शिक्षणाबद्दल उदासीन आणि अनियमित असतात ही सर्वविदित गोष्ट आहे. त्याबरोबरच शिक्षण मध्येच सोडण्याचे प्रमाणही जास्त असते. याची दोन प्रमुख कारणे आहेत. एक तर या मुलांना योग्य ते सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण लाभत नाही त्यामुळे शाळेत जाण्याची प्रेरणा त्यांना मिळत नाही. दूसरे म्हणजे ही मुले बहुतांशी गरीब परिस्थितीतील असतात आणि अगदी लहान वयात त्यांचे आईवडील त्यांनी कमवावे असा आग्रह करतात.

३) सांस्कृतिक वातावरणाच्या उन्नतीची प्रक्रिया फार मंद असते. कृत्रिमपणे केलेल्या वातावरणात या मुलांना वाढविणे, देशातील उपलब्ध साधनांमध्ये शक्य नाही. त्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी सीमीत आणि निवडक पायावर प्रयत्न केले पाहिजेत अशी आयोगाची सूचना आहे.

४) एक म्हणजे अन्य मागासवर्गीयांची लोकसंख्या अधिक असणाऱ्या क्षेत्रात प्रौढ शिक्षणाचा शिस्तबद्ध आणि कालबद्ध कार्यक्रम सुरू केला पाहिजे. हा मुलभूत प्रेरणादायक दृष्टीकोन आहे. कारण योग्य पद्धतीने प्रेरणा मिळालेले आईबापच आपल्या मुलांच्या शिक्षणात खरा रस घेतील. दुसरे म्हणजे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने शिक्षणासाठी प्रोत्साहक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने निवासी शाळांची स्थापना झाली पाहिजे. गरीब आणि मागासलेल्या कुटुंबातील मुलांना आकर्षित करण्यासाठी या शाळांमध्ये जेवण, राहणे यासारख्या सर्व सोयी मोफत उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. अन्य मागासवर्गीय विद्यार्थ्यां साठी उपयुक्त सोयी असणारी वेगळी सरकारी वसतीगृहे स्थापित करणे हे योग्य दिशेने उचललेले पाऊल ठरेल.

५) मर्यादित प्रमाणात, निवडक ठिकाणी या दोन्ही आघाड्यांवर सुरुवात केली पाहिजे पण साधने उपलब्ध होतील त्याप्रमाणात वेगाने या हालचाली सुरू केल्या पाहिजे. याचा परिणाम संपूर्ण समाजावर निश्चितच दिसून येईल.

६) शिक्षण हेच परिवर्तनाचे उत्कृष्ट साधन असल्याने मागासवर्गाला शिक्षण देणे हाच त्यांचा आत्मसन्मान जागृत करण्याचा आणि त्यांची सामाजिक पातळी उंचाविण्याचा योग्य प्रयत्न ठरेल. आपल्या शिक्षण पद्धतीतील अवाजवी खर्च अन्य मागासवर्ग करू शकत नसल्याने त्यांचे शिक्षण व्यावसायिक प्रशिक्षणोन्मुख असले पाहिजे. नोकऱ्यांतील आरक्षणामुळे त्यांच्यातील काही टक्के लोकांना नोकऱ्या मिळाल्या तरी इतरांना व्यावसायिक हस्तकलेत प्रवीण केले पाहिजे. म्हणजे शिक्षणात काही वर्षे घालविल्यानंतर त्यांना त्याचा लाभ मिळेल.

७) वरील सर्व सवलती अन्य मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिल्या तरी तांत्रिक आणि इतर व्यावसायिक शिक्षण संस्थांमधील प्रवेशांसाठी इतरांबरोबर स्पर्धा करणे त्यांना शक्य होणार नाही. हे लक्षात ठेऊनच केंद्रीय आणि राज्य सरकारांनी चालविलेल्या सर्व वैज्ञानिक, तांत्रिक आणि व्यावसायिक संस्थांमध्ये अन्य मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव जागा असल्या पाहिजेत अशी शिफारस आयोगाने केली आहे. घटनेच्या १५ (४) कलमांतर्गत हे आरक्षण असेल आणि त्याचे प्रमाण सरकारी नोकऱ्यांप्रमाणे म्हणजेच २७ टक्क्यांपेक्षा अधिक जागांसाठी आरक्षण केले असेल त्यांना ही शिफारस लागू होणार नाही.

८) परंतु ज्यांना राखीव कोट्यात प्रवेश दिला जातो. ते उच्च शिक्षणाचा पूर्ण लाभ कसा घेतील याकडे योजना कार्यान्वित करताना पूर्णपणे लक्ष दिले पाहिजे. सर्वसाधारणपणे हे विद्यार्थी गरीब आणि असांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील असल्यानें ते इतर विद्यार्थ्यांसाठी आपल्या तांत्रिक आणि व्यावसायिक उमेदवारांना राखीव कोट्यातून विविध ठिकाणी प्रवेश दिले की आपले काम झाले असे संबंधित अधिकाऱ्यांना वाटू नये. तर त्यानंतरच त्यांचे खरे काम सुरू होते. या विद्यार्थ्यांना विशेष कोचिंग देण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत हे विद्यार्थी फक्त निराशच राहणार नाहीत तर देश साधनहीन आणि खालच्या दर्जाच्या इंजिनियर, डॉक्टर आणि अन्य व्यावसायिकांनी भरून जाईल.

विविध

१ देशाच्या काही भागात मच्छिमार, वंजारी, लाकुडतोडे, यासारखे व्यावसायिक समूह आजही स्पृश्यास्पृश्यते सारख्या कलंकाने त्रासलेले आहेत. आयोगाने त्यांचा समावेश अन्य मागासवर्गीय यादीत केला आहे. पण त्यांना अनुसूचित जाती/जमातींच्या यादीत समाविष्ट करण्याचा विचार शासनाला करता येईल.

२) त्यांच्या विकासासाठी वेगवेगळे सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उपाय केंद्र व राज्य पातळीवर राबविण्यासाठी मागास वर्ग विकास महामंडळ स्थापन केले पाहिजे.

३) त्यांच्या हिताच्या रक्षणासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी अन्य मागासवर्गीयांसाठी एक वेगळे मंत्रालय खाते स्थापन केले पाहिजे.

४) अन्य मागासवर्गीयांमध्येही काही अधिक मागासवर्ग आहेत.उदा. हिमाचल प्रदेशातील गद्दी, महाराष्ट्रातील नवबौद्ध, किनारी भागातील मच्छिमार, जम्मू काश्मीर मधील गुजर इत्यादी. यांना योग्य ते प्रतिनिधित्व मिळावे म्हणून परिसीमा निश्चित करताना त्यांच्या क्षेत्राचा वेगळा भाग निर्माण केला जावा अशी आयोगाची शिफारस आहे.

केंद्रीय सहकार्य

१) अन्य मागासवर्गीयांसाठी काही कल्याणकारी योजना राबविण्याच्या दृष्टीने सध्या राज्य सरकारांना केंद्राचे सहकार्य उपलब्ध नाही. ज्या १८ राज्यांनी आणि केंद्रशासितप्रदेशांनी वरील उपाय अमलात आणले आहेत त्यांनी आपल्या साधनाच्या मदतीने आर्थिक सहाय्य एकत्र केल आहे. अन्य मागासवर्गीयांच्या विकासाच्या खास योजनांसाठी जोपर्यंत केंद्राकडून भरघोस मदत मिळणार नाही तोपर्यंत यासारखी कोणतीही लाभदायक योजना उपलब्ध साधनांच्या मदतीने राबविणे राज्य सरकारांना शक्य होणार नाही. असे आयोगाने केलेल्या दौऱ्यामध्ये जवळ जवळ सर्वच राज्य शासनांनी सांगितले.

२) याबाबतीत राज्य शासनांच्या विचारांशी आयोग पूर्णपणे सहमत आहे. अन्य मागासवर्गीयांसाठी तयार केलेल्या सर्वखास विकासशील कार्यक्रमांसाठी त्या योजनांच्या प्रमाणांत केंद्र शासनाने आर्थिक मदत द्यावी अशी शिफ़ारसही आयोगाने केली आहे. सध्या अनुसूचित जाती व जमातींना अशा प्रकारची मदत दिली जाते.

३) या सर्व योजनेचे २० वर्षांनंतर सिंहावलोकन केले. जावे अशी शिफारसही आयोगाने केली आहे. सामाजिक जागरूकतेसाठी इतका कालावधी लागतोच, हे जाणूनच आयोगाने २० वर्षांची शिफारस केली आहे. यापेक्षा कमी वेळांत केलेली अशा प्रकारची पाहणी योग्य होणार नाही आणि या शिफारशींचा प्रभाव अन्य मागासवर्गीयांच्या सध्याच्या पातळीवर आणि जीवन पद्धतीवर पडणार नाही असेही आयोगाचे मत आहे.

राखीव जागांचे प्रमाण व योजना

१) देशातील एकूण लोकसंख्येच्या २२.५ टक्के अनुसूचित जाती व जमातींची लोकसंख्या आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या अधिकारातील सर्व नोकऱ्या आणि सरकारी क्षेत्रातील उपक्रमात त्यांच्यासाठी २२.५ टक्के जागा राखीव आहेत, राज्यातील राखीव जागा मात्र त्या त्या राज्यातील अनुसूचित जाती व जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आहेत.

२) हिंदू आणि अहिंदू या दोन्हीतील अन्य मागासवर्गीयांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५२ टक्के आहे. त्याप्रमाणे केंद्र शासनातील ५२ टक्के नोकऱ्या त्यांच्यासाठी राखीव असायला हव्या, पण घटनेतील १५ (४) आणि १६ (४) या कलमांनुसार अंतर्गत राखीव जागांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा कमी असावे असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. त्यामुळे अनुसूचित जाती आणि जमातींच्या २२.५ टक्के राखीव जागांमध्ये या अन्य मागासवर्गीयांच्या जागा मिळविल्या तर एकूण राखीव जागांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा कमी झाले पाहिजे या कायद्याच्या अडचणीमुळे मंडल आयोगाने फक्त २७ टक्के राखीव जागांची शिफारस केली आहे.

३) ज्या राज्यांनी अन्य मागासवर्गासाठी २७ टक्क्यांपेक्षा जास्त जागा राखीव ठेवल्या आहेत त्यांना वरील शिफारस लागू होणार नाही.

४) राखीव जागांच्यासंबंधी वरील सर्व सामान्य शिफारशीबरोबर अन्य मागासवर्गीयांसाठी राखीव जागांच्यासंबंधात खालील योजना विचारार्थ आहे.

अ) खुल्या स्पर्धेत योग्यतेच्या आधारावर भरती केलेल्या अन्य मागासवर्गीय उमेदवारांच्या समावेश या २७ टक्के राखीव जागात केला जाउ नये.

ब) वरील आरक्षण सर्व पातळ्यावरील पदोन्नतीच्या कोट्यातही ग्राह्य मानले जावे.

क) भरल्या न गेलेल्या राखीव जागा दोन वर्षांपर्यंत तशाच ठेवाव्या आणि त्यानंतर त्यांचे आरक्षण रद्द करावे.

ड) सरळ स्पर्धेत अनुसूचित जाती आणि जमातींवर दिली जाणारी कमाल वयोमर्यादेची सवलत अन्य मागासवर्गीयानाही दिली जावी.

इ) सध्या अनुसूचित जाती व जमातींच्या उमेदवारांसाठी उपयोगात आणली जाणारी रोस्टर पद्धत अन्य मागासवर्गीयांसाठी पदांच्या प्रत्येक वर्गासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी उपयोगात आणावी.

५) राखीव जागांची उपरोक्त योजना संपूर्णपणे राष्ट्रीयकृत बँकाबरोबरच, केंद्र आणि राज्य सरकारांच्या सार्वजनिक क्षेत्रातील सर्व उपक्रमांमध्ये लागू करण्यात यावी.

६) शासनाकडून कोणत्याही रुपाने आर्थिक सहकार्य घेणाऱ्या खाजगी क्षेत्रातील सर्व व्यवसायांमध्ये ही कर्मचाऱ्यांची भरती करताना उपरोक्त योजनेच्या आधारावर भरती करण्यास भाग पाडावे.

७) सर्व विद्यापीठे आणि संबंधित महाविद्यालयानाही राखीव जागांच्या या योजनेची कल्पना दिली जावी.

८) या शिफारशींना पूर्णपणे प्रभावी करण्यासाठी वर्तमान अधिनियम, कायदे, कार्यपद्धती यांचा शोध घेऊन त्यात घटनात्मक बदल करून घेणे आणि त्या त्या योजनेला अनुरूप बनविणे आवश्यक आहे.

सामाजिक रचनेतील परिवर्तन

१) अर्थात मागासवर्गाची समस्या मुळातूनच सोडविण्याचे प्रयत्न होत नाहीत तोपर्यंत सरकारी रोजगार, शैक्षणिकं स्थांमधील आरक्षण आणि सर्व आर्थिक सहायता कमीच पडेल हे निश्चित लहान शेतकरी, शेतमजूर, भूमीहीन, ग्रामीण कारागीर, अकुशल मज़ूर हेच अनुसूचित जाती व जमाती आणि अन्य मागासवर्गीयात मोडतात. सामाजिक परंपरांशिवाय गरीब शेतकऱ्यांना कर्जाऊ पैसे देऊन जमिनीचे लहान लहान तुकडे पट्ट्यावर देऊन घरासाठी किंवा राहण्यासाठी जमीन देऊन आणि त्यांचे विनामूल्य श्रम घेऊन त्यांच्यावर उच्चवर्गीय शेतकरी सतत गाजवितात. या उच्च शेतकरी वर्गातीलच सरकारी अधिकारी असल्याने त्यांच्यातील वर्ग आणि जातींचे संबंध कायम राहतात. हा सामाजिक आणि राजकीय उच्च शेतकऱ्यांच्या बाजूला झुकत असल्याने त्यांचे इतरांवर वर्चस्व राहते.

२) उपरोक्त परिस्थितीच्या परिणामी अन्य मागास वर्गीयांची संख्या जास्त असूनही ते उच्च वर्णीय आणि श्रीमंत वर्गाच्या मानसिक व शारीरिक वर्चस्वाखाली राहतात. एकूण तीन

चतुर्थांश लोकसंख्या असूनही अनुसूचित जाती व जमाती आणि अन्य मागासवर्गीयांना फारचं थोडी राजकीय शक्ती प्राप्त झाली आहे. उत्पादन — साधनांवरील आपल्या एकाधिकाराच्या मदतीने उच्चवर्णीय मागासवर्गांना त्यांच्या इच्छेविरुद्ध वागण्यास भाग पाडतात. त्यामुळे नवीन जमीन सुधारणा कायद्यांनी सध्याचे उत्पादन संबंधातील अडथळे दूर केले जात नाहीत, तोपर्यंत शोषित वर्ग उच्चवर्णीयांवर अवलंबून राहतील. वास्तविक जमीनदारीबाबत व्यापक तरतुदी घटनेत आहेत. पण त्यांच्या अंमलबजावणीत अनेक अडचणी, निरुत्साह आड येतो. कर्नाटक, केरळ आणि पं. बंगालसारख्या राज्यांनी अन्य मागासवर्गीयांसाठी अत्यंत प्रामाणिकपणे कार्य केले आहे. त्यांनी अन्य मागासवर्गीयांना फक्त सहकार्यच दिले नसून त्याचा योग्य तो राजकीय लाभही घेतला आहे.

३) अन्य मागासवर्गीयांच्या कल्याण आणि विकासासाठी वर्तमान उत्पादन संबंधात परिवर्तन करणे हे महत्त्वाचे पाऊल ठरेल असे आयोगाचे मत आहे. अनेक कारणांमुळे औद्योगिक क्षेत्रात हे परिवर्तन शक्य नसेल तर शेती क्षेत्रात असे परिवर्तन शक्यही आहे आणि आवश्यकही आहे.

४) म्हणून सर्व राज्य सरकारांनी जमीनविषयक प्रगतीशील कायदे करून त्यांची अंमलबजावणी करावी. अशी आयोगाची आग्रही शिफारस आहे. त्यामुळे गावातील विद्यमान उत्पादनसंबंधांमध्ये परिवर्तन होऊ शकेल.

५) सध्या अनुसूचित जाती व जमातींना जमीनीचे वाटप केले जात आहे. कमाल धारणा कायदा लागू केल्यामुळे भविष्यात उपलब्ध होणाऱ्या शिल्लक जमिनीचा एक भाग अन्य मागासवर्गीयातील भूमीहीन मजुरांना वाटला गेला पाहिजे.

अन्य मागासलेल्या जातींची नावे

महाराष्ट्र

(१) आगरी, आगळे किंवा कोलन (२) अहीर, यादव, गवळी (३) अलितकार (४) अतार (५) अवधिया (६) बडक (७) बडिया (८) बगालू (९) बागडी (मारवाडी बावरी, मारवाड वाघरी, सातल वाघरी (१०) बजानिया (११) बहुरूपी (१२) बैरागी, गोसाई, उदासी (१३) बाजीगर (१४) बाल संथानम (१५) बंदी (१६) बंजारा, बंजारी, वंजारा, मथुरा बंजारा, गोरबंजारा लंबाडा, लंबारा, लम्भानी, चारण बंजारा, लभान, मथुरा लभानी, कचकीवाले बंजारा, लामण बंजारा, लाभण, लाईमानी, लबान घाली, धलिया, घाडी, घारी सिंगरी, नावी बंजारा, जोगी बंजारा, बंजारी, शिनगडे बंजारा, लम्बाडे फणाडे बंजारा, सुनार बंजारा, वाल्या बंजारा शिंगाडिया बंजारा, (१७) बंतु (१८) बावरिया (१९) बारी किंवा बारई (२०) बरिया कोली, बरिया (२१) बथीनी (२२) बावचा (२३) बेगारी, बेडर, बेरड, नाईक वाडी, तलवार, वाल्मिकी (२४) बेसदेवा (२५) बेस्तर, चबलू वड्डार (२६) भाट (२७) भडभुंजा (२८) भामटा किंवा घंटीचोर किंवा परदेसी, पोंग, दासर उचिला, र जपूत-भामटा, भामटी, कामटी, पाथरूट, टकारी, उचले (२९) भांड (३०) भंडारी (३०) अ) भंडुरा बिल्लावर (३१) भांटा (३२) भराडी, बालसंतोषी, किंगरीवाले, नाथबाबा, नाथजोगी, नाथपंथी दवरी गोसावी (३३) भवय्या किंवा तारगल (३४) भावीण (३५) भिल्लाला (३६) भिना कोया (३७) भोई करबी, ढीवर, भोई झिंगाभोई, परदेशी भोई, राजभोई, भोई, कहार गाडियां कहार, किरात, मचवा, मांझी, जतिया, केवट, ढीवर, ढिमर, पालेवार, मच्छेन्द्र, नावाडी, मल्हार, मल्हव, गाढवभोई, खाडी भोई, खारे भोई, घेवरा धुरिया कहार (३८) भिस्ती किंवा परवाली (३९) भोयर (पवार) (४०) भुत्ते, भोपे (४१) बिदंली (४२) बुरबूक (४३) बुरूड, मेडर (४४) बुट्टाल (४५) चादर (४६) चक्रवाद्य, दासर (४७) चमथा (४८) चांडाळ (४९) चांडालगाडे (५०) चरण किंवा गाढवी (५१) रोडीचराछा (५२) चेन्वू किंवा चेन्चावार (५३) छप्परबंद (५४) चिमूर (५५) चिंतला (५६) चिप्पा (५७) चित्रकथी (५८) चोधा (५९) खिश्चन (शे. का. मधून धमातरित (६०) दाबगर (६१) डक्कोलेरू (६२) दर्जी (६३) देपला (६४) देपला (६५) देवांगा (६६) देवरी, गोसावी, नाथपंथी (६७) देवदिग (६८) देवली (६९) धनगर, कुरुबा, कुरुबर (७०) ढिमर, डिवर, गाबित हरकन्त्रा, मंगेली मंगेले पागे, संदुरी (७१) धोबी, परीट, वाट, मडबल रजक (७२) ढोली (७३) डोम्मारा (७४) फकीर बंदरवाला (७५) फुटगुडी (७६) गदाबा किंवा गोडबा (७७) गदारिया (७८)

गद्री (७९) गाढवी (८०) गणाली किंवा गंडाली (८१) गंधारप (८२) गंगानी (८३) गारोडी, गारुडी (८४) गारपगारी (८५) गवंडी (८६) घाडसी (८७) घिसाडी, घिसाडी लोहार, गाडी लोहार, चितोडी लोहार, राजपूत लोहार (८८) गोल्ला, गोल्लेवार, गोलेर, गोलकार, गोल्लर (८९) गोंधळी गोंडाला (९०) गोपाल, गोपाल भोरपिस, खेलकरी (९१) गोसावी, बाबा, बैरागी, भारती, गिरीगोसावी, भारती गोसावी, सरस्वती पारबत, सागर, बाण किंवा वाण, तीर्थ आश्रम, अरण्य घरभारी, संन्यासी नाथपंथी गोसावी (९२) गोचाक्री (९३) गुजरात बावरी (९४) गुरव (९५) हबुरा (९६) हलेपाईक (९७) हरणमी (९८) हटकर (९९) हेलवे, हिंलव (१००) हिल्लरेड्डी (१०१) जगियासी (१०२) जाजक (१०३) जंगम (१०४) जातिगर (१०५) जतिया (१०६) जवरी जोहरी (१०७) झाडी (१०८) जिनगर (१०९) जोगी, नाथ, नाथजोगी, गोसाई देवरी (११०) जोगीण (१११) जोशी, बुड्डूकी, डकरू, वाले, कुडमुडे, मेघांगी, सरोदे सरवदे सरोदा, सहदेव जोशी, सरोदे (११२) जुलाहा, बिणकर, वाणकर, वन्य (११३) काची, कछीया (११४) कचोरा (११५) कदेरा (११६) कैकाडी (११७) जेथे S.C. नाही तेथे) कोरच, धोतले, कोरवा किंवा कोची कोरवा, माकडवाले, पडलर कोरवी (११७) कलाल, कलार, लाडलाडवक, गोंड कलाल, शिवहरे (११८) कामाटी (११९) कम्मी (१२०) कंदेल (१२१) छारा, कंजर, नात (१२२) कापडी (१२३) कासार, कसेरा (१२४) कसबी (१२४ अ) कसाई, खाटिक कसाब (१२५) कासी कापडी (१२६) कटाबू (१२७) काथर काथवानी, कंठा हरवानी (लिंगायत वाणी किंवा लाडवाणी सोडून) (१२८) काथा-खाती (१२९) कटिपामुला (१३०) खराव किंवा खारवी (१३० अ) किरार (१३१) कोल्हाटी, डोंबारी (१३२) कोळी, कोळी, सूर्यवंशी, मल्हार कोळी, खिश्चन कोळी (१३३) कोरचा किंवा येरकुला किंवा कोरवे (१३४) कोरचर (१३५) कोरवा कोडाकूसहित (१३६) कोमाकापू (१३७) कोन्डू (१३८) कोंगाडी (१३९) कोष्टी, काशकोटी देवांगा (१४०) कुचबध (१४१) कुछरिया (१४२) कुंभार, कुम्हार (१४३) कुणबी (१४४) कुरहिनशेट्टी (१४५) कुरमार (१४६) लाभा (१४७) लडाफ्फ, लडाफ (१४८) लाधिया, लाधिया लारिया (१४९) लेखेरा, लाखारी (१५०) लांझड (१५१) लोहार, लोहार-गाडा, डाडी, खातवाडी पांचाळ (१५२) लोनारी, चुनारी (१५३) मच्छी, तांडेल (१५४) मगा (१५५) महाली, माहली (१५६) माहिल (१५७) मैधासी (१५८) मैराळ, दांगट, बिर (१५९) मझवार (१६०) माली, फुलमली (१६१) मानभाव (१६२) मंगाला (१६३) मारवार्ड बावरी (१६४) मसानजोगी, सुडगादिसध्वा, मापनजोगी (१६५) मथुरा (१६६) मटिहारा खालु मातीहारा (१६७) मकार, खालु (१६८) मे (१६९) मिना (१७०) मिठा (१७१) मोमीन (विणकर) (१७२) मोन्डीवार, मोन्डीवारु (१७३) मुंडा (१७४) नाव्ही, न्हावी हजाम, कलसेरु नावलिंगा, केलाशी, नाभिक, नाई (१७८) नीली

(१७९) नीलकंटी (१८०) नेकर, जंडा (१८१) नव बौद्धिकष्ट (१८२) नेथुरा (१८३) निलगार, निराली (१८४) निरशिकारी (१८५) नोनिया (१८६) ओतारी, ओतनकर, ओतकर, बतारी, ओझारी (१८७) पाचभोतला, पाचबोटला (१८८) पधारिया (१८९) पदमपारी (१९०) पदिआर (१९१) पखाली, भिस्ती (१९२) पालपारधी (१९३) पमुला, पांचाळ (१९४) पंचमा (१९५) पंडा (१९६) पांगुळ (१९७) पांका (१९८) पाटकर (१९९) पत्रादवेरू (२००) पेरकी (२०१) फार (२०२) फासेचारी (२०३) फुदगी (२०४) फुलारी (२०५) पिंजारा, पिंजारी (२०६) पुरवाली (२०७) पुतलीगर (२०८) रचबांधिया (२०९) राचेवार (२१०) रचकीया (२११) रघवी (२१२) राइकारी (२१३) राजपारधी, गावपारधी हरणशिकारी (२१४) राजपूत भामटा, परदेशी भामटा, परदेशी भामटी (२१५) रामोशी (२१६) नोत, राउतिया, रावत (२१७) रंगारी, रंगरेज भावसार (२१८) राऊतिया (२१९) रावळ, रावळ किंवा रावळयोगी (२२०) सहीस, साईस, शिस (२२१) साळी, पद्मशाली, स्वकुलशाली (२२२) संगर (२२३) सांगरी (२२४) संजोगी (२२५) सताल (२२६) सीन्ता किंवा साऊन्ता (२२७) साव-तेली (२२८) सपेरा (२२९) सरानिया (२३०) सरे (२३१) शिलवट (२३२) शिंपी, भावगर, शिव-शिंपी नामदेव (२३३) शिंगदव किंवा शिंगाड्या (२३४) सिक्कलगर, कोटारी (२३५) सिंधोर (२३६) सिंगीवाला (२३७) सोनार (२३८) सोरे (२३९) सुन्ना (२४०) सुन्नाई, सुथारिया (२४१) सुतार, बढई, वाढई (२४२) सुप्पालिंग (२४३) टाकणकर (२४४) टकारी (२४५) तलवार कनाडे (२४६) तांबट (२४७) तांबोळी (२४८) तारगला (२४९) तेली, गणिगा, घंची (२५०) उक्कार (२५१) थलारी (२५२) थेटवार (२५३) थोगटी थोगाटी (२५४) थोटेवाडू (२५५) थोरिया (२५६) तिमाली (२५७) वाघरी, वघारी, सालत, सालट वघारी (२५८) वैदू (२५९) वैती (२६०) वलवई (२६१) वंजारी, वंजार (२६२) वासवा (२६३) वासुदेव (२६४) विथोलिया (२६५) वड्डेर, वड्डेर, (कलावडेर किंवा पथरोड), वेलदार, ओड गिरनी वड्डार वड्डुर, गद्दीवड्डुर जाति वड्डुर, माती वड्डुर पाथरवट (२६६) वाडी (२६७) वंजारी, वंजारा (२६८) वान्स फोडा (२६९) वरठी (२७०) वनाडी (२७१) येनादिवाड (२७२) येरागोलाबाद किंवा थेल्ला पामलवाड

गोवा, दमण आणि दिव

(१) भंडारी (१ अ) बंजारा, लंबाडी, लमानी, सुगाली (२) खीश्च्यान चमार (३) खीश्चयन महार (४) धनगर (५) धोबी (६) ठोर (७) गावडा (८) गोगी (९) गोसावी (१०) कासार (११) कोळी (१२) कुनबी (१३) मीत्ला (१४) नायडू (१५) नाथ, जोगी (१६) न्हावी, नाई (१७) सगर (१८) यादव, गवसी

तक्ता नं. १

इतर मागास जाती, अनुसुचित जाति/जमातिचं केंद्र सरकारी नोकऱ्यांत प्रमाण

	प्रथम श्रेणी			द्वितीय श्रेणी			तृतीय व चतुर्थ			सर्व वर्ग		
	एकूण	एस्सी/एस.टी.	ओ.बी.सी.	एकूण	एस्सी/एस.टी.	ओ.बी.सी.	एकूण	एस्सी/एस.टी.	ओ.बी.सी.	एकूण	एस्सी/एस.टी.	ओ.बी.सी.
१. मंत्रिमंडळे/खाती	११७०७	८४० (७.१८)	३०३ (२.५९)	४३८०३	५९८५ (१३.६६)	१७४२ (३.९८)	१७८२९	५५१८ (३०.९५)	१५०० (८.४१)	१३३३९	१२४३ (१६.८३)	३५४५ (४.८३)
२. स्वायत्त संस्था व संलग्न आणि दुय्यम कचेऱ्या	८१३२५	५३९९ (६.६४)	४१४७ (५.०९)	५०३३३७	९१४३१ (१८.१६)	५९०७९ (११.७४)	३२२९४८	६७११८ (२०.७८)	६७७८६ (२०.९८)	९०७६१०	१६३९४८ (१८.०६)	१३१०१२ (१४.४३)
३. सार्वजनिक क्षेत्र	८०९९४	३६५२ (४.५१)	३७१९ (४.५९)	३६५७८५	६८५६६ (१८.७४)	३६२४२ (९.९१)	१४३९१०	४५६४६ (१३.७२)	२२६८९ (१५.७७)	५९०६८९	११७८६४ (१९.९५)	६२४७ (१०.७)
४. एकूण	१७४०२६	९८९१ (५.६८)	८१६९ (४.६९)	९१२९२५	१६५९८२ (१८.१८)	९७०६३ (१०.६३)	४८४६८७	११२८२ (२४.४०)	९१९७५ (१८.९८)	१५७१६३८	२९४१५५	९९३१ (१३.३)

तक्ता नं. २ **ओ. बी. सी., अनुसुचित जाती/जमातिचे**

खाती	पहिली श्रेणी एकूण	एस.सी./एस.टी.	ओ./बी.सी.	दूसरी श्रेणी एकूण	एस.सी./एस.टी.
१. कृषी व जलसिंचन	११४६	७७	६६	४२५८	५२१
२. आण्विक ऊर्जा	५८	२	...	१०७	—
३. व्यापार नागरी पुरवठा व सहकार्य	१७२४	९५	६६	४३७५	५३६
४. संपर्क	४४७४	२६०	३७३	१२१४३	२२२३
५. शिक्षण व सामाजिक कल्याण	७०७	१२	१२५	२९७	११०
६. ऊर्जा	५०७०	१७८	४१	१३०८६	६७७
७. आरोग्य आणि कुटुंब कल्याण	३५	२	...	४८०	७२
८. उद्योग	२०४१	१६१	८८	६०५४	७८१
९. पेट्रोलियम, रसायन	१६२१७	७८५	३२३	४१४६४	४३०७
१०. विज्ञान व तंत्रज्ञान	१४८	३	२	५०९	८२
११. जहाज व दळणवळण	३०४४	१४२	११६	११५३६	१३६५
१२. पोलाद व खाणी	३७८७७	१२९७	२४५१	२५०१६४	५४८४३
१३. प्रवास	७९२३	६०५	५९	१८९९५	२८०१
१४. सार्वजनिक बांधकाम व घरबांधणी	५३०	३३	९	१३१७	२४८
एकूण	८०९९४	३६५२	३७१९	३६५७८५	६८५६६
एकूण पैकी एस्सी/एस.टी. ओ.बी.सी.ची टक्केवारी		४.५ %	४.६ %		१८.७ %

सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यांत प्रमाण

	तिसरी आणि चवथी श्रेणी			सर्व श्रेणी		
ओ.बी.सी.	एकूण	एस.सी./एस.टी.	ओ.बी.सी.	एकूण	एस.सी./एस.टी.	ओ.बी.सी.
४२८	३४०५	८३८	५१८	८८०९	१४३६	१०१२
१	२३९०	१०५९	१७१	२५५५	१०६१	१७२
५५८	११३०	२३४	१८०	७२२९	८६५	८०४
२३३३	४८०६	१७९८	४१९	२१४२३	४२८१	३१२५
३२५	६०३	१९२	२१८	२६०७	३१४	६६८
९२०	९२५८	१९३४	७६७	२७४१४	२७८९	१७२८
...	२२२	६१	००	७३७	१३५	००
५५१	२७०९	७८१	३७१	१०८०४	१७२३	१०१०
३२०४	१६३२६	४०८२	१८५६	७४००७	९१७४	५३८३
३०	९३	३०	१०	७५०	११५	४२
११५०	४७५१६	६३१०	९२२८	६२०९६	७८१७	१०४९४
२६३९०	४३४०३	२४०१०	८७१४	३३१४४४	८०१५०	३७५५५
३४१	११३०५	४०८४	२३७	३८२२३	७४९०	६३७
११	८४४	२३३	००	२५९१	५१४	२०
३६२४२	१४३९१०	४५६४६	२२६८९	५९०६८९	११७८६४	६२५६०
९.९ %		३१.७ %	१५.८ %		१९.९ %	१०.६ %



● **धरमचंद चोरडिया**
जन्म - ५ नोव्हेंबर १९५०

पत्रकार-संपादक साप्ताहिक सुदर्शन (धुळे)
अनेक वृत्तपत्रातून सातत्याने लेखन.
धुळे जिल्ह्यातील आदिवासी चळवळीपासून
सामाजिक-राजकिय कामास प्रारंभ,
दलित, आदिवासी व इतर मागासवर्गीय
आणि महिला, भूमिहिन, शेतमजूर आदि
समाजाच्या शोषित वर्गासाठी सातत्याने प्रबोधन आणि आंदोलन
१९६६ पासून भारतीय जनसंघाचे काम
आणीबाणीत १९ महिने कारावास
नामांतर सत्याग्रह आणि अन्य जनआंदोलनात कारावास
१९७७ साली धुळे जिल्हा जनता पार्टीचे सरचिटणीस
१९७८ साली भारतीय जनता युवा मोर्चा
चे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व १९८२ साली राष्ट्रीय चिटणीस
१९८२ ते ८६ भारतीय जनता पार्टी चे प्रदेश चिटणीस
१९८७ पासून प्रदेश सरचिटणीस
महाराष्ट्र आणि गोव्यातील पक्षाच्या संघटनात्मक कामाची जबाबदारी

मुखपृष्ठ :
सुरेश तिकोने

मुद्रण :
रचना मुद्रण
दादर, मुंबई- ४०० ०१४
फोन : ४११३४२४

● **किंमत पांच रुपये**

प्रकाशक: प्रभाकर खेर
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र
सी.डी.ओ. बॅरॅक क्र.१, नरीमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२०.